

पंढरपूर : दिवाळीला सुरुवात झाली असून वसुबारसनंतर शनिवारी धनत्रयोदशीचा उत्साह सर्वत्र पहायला मिळाला. यानिमित्ताने पांडुरंगाची पंढरी नगरीदेखील दिव्यांच्या प्रकाशात उजळून निघाली असून चंद्रभागेच्या घाटावर त्याचे सोनेरी रूप दिसून आले.

रायगड, नवी मुंबई
◆ वर्ष १८ ◆ अंक ९२
www.ramprahar.com
# राम प्रहर
◆ रविवार, १९ ऑक्टोबर २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

अंतरंग

आरसीएफ प्रकल्पग्रस्तांचे आंदोलन तुर्त स्थगित/२
रविवारनिमित्त विविध विषयांवरील लेख/४, ६
भारत-ऑस्ट्रेलिया पहिली वनडे लढत आज/८

# पाणीपुरवठ्यात सुधारणा होईपर्यंत नवीन प्रकल्पांना सीसी-ओसी देऊ नका

## आमदार प्रशांत ठाकूर यांची सिडको एमडींकडे मागणी



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सिडकोने इमारती, प्रकल्प उभारले, मात्र नियोजनाअभावी पाणीपुरवठा करण्यात ते अपयशी ठरले आहेत. या कारणाने सिडकोच्या वसाहती भागांत गेल्या काही दिवसांपासून पाणीटंचाई निर्माण झाली आहे. त्यामुळे जोपर्यंत पाणीपुरवठ्यात योग्य प्रकारे सुधारणा होत नाही, तोपर्यंत नवीन गृहनिर्माण प्रकल्पांना सीसी-ओसी मंजुरी देऊ नये, अशी मागणी आमदार प्रशांत ठाकूर यांनी सिडकोचे उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल यांच्याकडे केली आहे. त्याचबरोबर पाण्यासंदर्भात अशीच स्थिती राहिली, तर लोकप्रतिनिधी म्हणून मी सर्व नागरिकांना घेऊन सिडकोविरोधात तीव्र जनआंदोलन उभारीन, असा इशाराही त्यांनी दिला आहे.

आमदार प्रशांत ठाकूर यांनी या संदर्भात दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, पाणीपुरवठा विभागातील अधिकारी गंभीरतेने काम करीत नसल्याने नागरिकांना सणासुदीच्या काळातही पाण्याअभावी त्रास सहन करावा लागत आहे. दरवर्षी सण-उत्सवाच्या काळात पाणीपुरवठा खंडित होतो. त्यामुळे काही अधिकारी मुद्दामहून नागरिकांना अडचणीत टाकत आहेत का, अशी शंका निर्माण झाली आहे. त्यांनी पुढे म्हटले आहे की, पाण्याचे टँकर वाटपसुद्धा काही अधिकारी मनमानी पद्धतीने करीत आहेत. नागरिकांच्या रोषाचा मुख्य भार लोकप्रतिनिधींवर येत असताना सिडको अधिकारी मात्र बेफिकीर वृत्तीने वागत आहेत. ही परिस्थिती अत्यंत संतापजनक असून तातडीने उपाययोजना न झाल्यास नागरिकांसह सिडकोविरोधात तीव्र आंदोलन करण्यात येईल.

सिडकोला 'शहरांचे शिल्पकार' म्हणवून घ्यायचे असल्यास नागरिकांना पुरेसा आणि नियमित पाणीपुरवठा देणे ही त्यांची प्राथमिक जबाबदारी आहे. 'शहरांचे शिल्पकार' असे मिरवणाऱ्या सिडकोला त्याच्या अंतर्गत नागरिकांच्या पाण्याची व्यवस्था करता येत नाही हे अत्यंत लज्जास्पद आहे. त्यामुळे सध्या पनवेल परिसरात सिडको प्रशासनाविषयी प्रचंड असंतोष आहे. वेळेवर सुधारणा न झाल्यास तीव्र आंदोलन हाच पर्याय उरेल, असा इशारा आमदार प्रशांत ठाकूर यांनी दिला आहे. जोपर्यंत पाणीपुरवठ्यात सुधारणा होत नाही, तोपर्यंत नवीन गृहनिर्माण प्रकल्पांना मंजुरी, सीसी-ओसी देऊ नयेत तसेच नवीन भूखंडांचे वाटप थांबवावे, अशी पुनर्मागणी आमदार प्रशांत ठाकूर यांनी सिडको प्रशासनाकडे केली आहे.

पाणीपुरवठा व वितरण व्यवस्था स्वयंचलित करण्याची आवश्यकता त्यांनी अधोरेखित केली असून पाणीपुरवठा विभागातील निष्काळजी व बेशिस्त अधिकारी-कर्मचाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याची मागणी करून नागरिकांना सुरळीत पाणीपुरवठा होईल याची खातरजमा करावी, असेही निवेदनातून अधोरेखित केले आहे.

सिडको अधिकाऱ्यांसोबत झालेल्या अनेक बैठकांद्वारे पनवेल विधानसभा क्षेत्र अंतर्गत सातत्याने होत असलेल्या अपुऱ्या पाणीपुरवठ्याबाबत आमदार प्रशांत ठाकूर यांनी वारंवार सूचित केले आहे व प्रशासनाचा या गंभीर प्रश्नाकडे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला आहे. या संदर्भात त्यांनी निवेदनात नमूद केले आहे की, या वर्षी अजूनपर्यंत खूप मोठ्या प्रमाणावर पाऊस होऊनसुद्धा, सर्व धरणे भरली असूनदेखील पनवेल अंतर्गत खारघर, कामोठे, नवीन पनवेल, तळोजा अशा ठिकाणी लोकांना तीव्र पाणीटंचाई जाणवत आहे. त्याबाबत सिडकोचे अधिकारी काहीही उत्तर देत नाहीत. पाणीटंचाईअभावी पाण्याचे टँकर देताना हे अधिकारी अत्यंत मनमानी पद्धतीने त्याचे वाटप करतात. त्यांच्या मर्जीप्रमाणे टँकर दिले जातात, असा माझा ठाम आरोप आहे. सिडको प्रशासनाच्या नाकर्तेपणाचा सर्व रोष, संताप हे नागरिक लोकप्रतिनिधींवर काढत असतात, मात्र सिडकोचे अधिकारी मजा करत असताना लोकांचा विनाकारण रोष लोकप्रतिनिधींवर निघत आहे. त्यातच आता ऐन दिवाळीच्या तोंडावर बऱ्याच ठिकाणी लोकांना पाणीटंचाई जाणवत आहे व त्यामुळे नागरिकांमध्ये सिडकोविरोधात प्रचंड संतापाचे वातावरण आहे.

### ...अन्यथा जनआंदोलन करण्याचा इशारा

ऐन दिवाळीच्या तोंडावर बऱ्याच ठिकाणी लोकांना पाणीटंचाई जाणवत असल्याने नागरिकांमध्ये सिडकोविरोधात प्रचंड संतापाचे वातावरण आहे. वास्तविक पाणीपुरवठा सुधारण्याकरिता, त्यात वाढ करण्याकरिता तसेच त्यामधील अनियमितता कमी करण्याकरिता सिडको प्रशासनाला अनेक सूचना केल्या आहेत, मात्र त्यावर अंमलबजावणी होत नाही. त्यामुळे सिडकोविरोधात नागरिकांच्या संतापाचा उद्रेक होण्याची शक्यता असून त्यांचा लोकप्रतिनिधी म्हणून मला सर्व नागरिकांना घेऊन सिडकोविरोधात तीव्र आंदोलन करावे लागेल याची नोंद घ्यावी आणि वेळप्रसंगी सिडको कार्यालयाला टाळे लावायलादेखील मागेपुढे पाहणार नाही इतकी लोकभावना तीव्र आहे व त्याची सर्व जबाबदारी सिडको प्रशासनाची राहील. अशी परिस्थिती उद्भवू नये असे वाटत असेल, तर तातडीने या प्रश्नी लक्ष देऊन पाणीपुरवठा नियमित करा, असा समजवजा इशाराही आमदार प्रशांत ठाकूर यांनी सिडकोला दिला आहे.

## भीषण अपघातात आठ भाविक ठार

**नंदुरबार : प्रतिनिधी**

अस्तंबा शिखरावरून परतणाऱ्या भाविकांनी भरलेले वाहन घाटातून थेट १०० फूट खाली कोसळून आठ भाविक जागीच ठार, तर १५ जण गंभीर जखमी झाले. हा अपघात शनिवारी (दि. १८) सकाळी १०.३० वाजता घडला.

नंदुरबार तालुक्यातील काही भाविक वसुबारसच्या दिवशी अस्तंभा (अश्वत्थामा) ऋषींच्या दर्शनासाठी गेले होते. तेथून शनिवारी परत येत असताना चांदसैली घाटात भीषण अपघात झाला. जखमी भाविकांना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

## सलग सुट्ट्यांमुळे महामार्ग फुलले



**माणगाव, खोपोली, खालापूर : प्रतिनिधी**

दीपावलीच्या सलग सुट्ट्यांमुळे लोक आपल्या गावाकडे निघाले आहेत, तर काही पर्यटकही फिरायला बाहेर पडल्याने रायगडातील महामार्गांवर वाहनांच्या रांगा लागल्याचे शनिवारी (दि. १८) दिसून आले. त्यातच दिवाळी खरेदीसाठी स्थानिक लोक तालुक्याच्या बाजारपेठेत जात असल्याने त्यांचीही यामध्ये भर पडली.

मुंबई, पुण्याकडून कोकणात जाणाऱ्या नागरिकांच्या वाहनांची वर्दळ वाढल्याने मुंबई-गोवा महामार्गावर वाहतूक विस्कळीत झाली. माणगाव परिसरात तर सुमारे तीन किलोमीटरपर्यंत वाहनांच्या रांगा लागल्या होत्या. त्याचबरोबर मुंबई-पुणे एक्सप्रेस वेवरील पुणे लेनवर वाहतूक कोंडी झाली. अमृतांजन ब्रिजपासून ते खोपोली एक्झिटपर्यंत सात ते आठ किमीपर्यंत वाहनांच्या रांगा लागल्या होत्या. एक्सप्रेस वेवर वाहतूक कोंडी झाल्याने काही वाहने खोपोलीतून जुन्या महामार्गाने बोरघाटातून लोणावळ्याकडे वळल्याने दस्तुरी आणि अंडा पॉईंडजवळही प्रचंड वाहतूक कोंडी झाली. याशिवाय जिल्ह्यातील इतरही महामार्ग, रस्ते वाहनांनी फुलल्याचे चित्र दिसून आले.

# पनवेल महापालिका हद्दीतील रस्त्यांची कामे लागणार मार्गी

## माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या उपस्थितीत बैठक



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

यंदा लवकर सुरू झालेल्या आणि लांबलेल्या पावसाने रस्त्यांची दुरवस्था झाली आहे. पनवेल महानगरपालिका हद्दीतील अशा खराब झालेल्या रस्त्यांची कामे संबंधित कंत्राटदारांनी कोणतेही बिल न देता नव्याने करून द्यावी, असे निर्देश महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी दिले आहेत.

पनवेल महापालिकेचे शहर अभियंता संजय कटेकर यांच्या दालनात रस्त्यांच्या कामांसंदर्भात शनिवारी (दि. १८) महत्त्वपूर्ण बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीला माजी सभागृह नेते परेश ठाकूर, माजी नगरसेवक अनिल भगत यांच्यासह व्हीडीआयपीएल, पीडीआयपीएल, टीआयपीएल, जेएमएम आयपीएल, पी.पी. खारपाटील कन्स्ट्रक्शन, झेनिथ, श्रीकृष्ण या कंपन्यांचे मालक, अभियंते उपस्थित होते.

या वर्षी वेळेआधीच मे महिन्यात पावसाने हजेरी लावली आणि हा पाऊस परतीच्या प्रवासात लांबला. त्याचा पावसाचा परिणाम रस्त्यांवरही झाला आहे. पनवेल महापालिका हद्दीत पावसामुळे जे रस्ते खराब झाले आहेत त्यांची कामे संबंधित कंत्राटदारांनी कोणतेही बिल न देता नव्याने करून देण्याचे निर्देश माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी बैठकीत दिले. अभियंत्यांच्या देखरेखीखाली चांगल्या दर्जाचे रस्ते तयार करावे, असेही त्यांनी सूचित केले. उपस्थित सर्व कंत्राटदारांनी ते मान्य केले असून लवकरच रस्त्यांची कामे सुरू होणार आहेत.



# तळोजात रंगला खेळ पैठणीचा

## लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते महिलांचा गौरव



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवानिमित्ताने सौ. विजयश्री ताई प्रतिष्ठानच्या वतीने तळोजा परिसरातील महिलांसाठी खेळ पैठणीचा या मनोरंजक कार्यक्रमाचे आयोजन शुक्रवारी (दि.१७) करण्यात आले होते. या सोहळ्याला लोकनेते रामशेठ ठाकूर आणि आमदार प्रशांत ठाकूर यांनी भेट देऊन शुभेच्छा दिल्या.

या वेळी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी बोलताना, आपला परिसर पूर्वी ग्रामीण होता. परिसराचे शहरीकरण होऊन मोठ मोठ्या इमारती उभ्या राहिल्या असल्या तरी भाजपचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते या इमारतींपेक्षाही मोठे काम करत आहेत, असे गौरवोद्गार काढले.

आमदार प्रशांत ठाकूर यांनीही या कार्यक्रमाला शुभेच्छा देताना सांगितले की, पनवेल महापालिकेच्या माध्यमातून ग्रामीण भागाचा विकास होत आहे. ज्या सुविधा सिडकोमार्फत शहरी भागात देण्यात येतात त्या सुविधा महापालिकेच्या माध्यमातून ग्रामीण भागातही देण्यात याव्या यासाठी भाजप सातत्याने पाठपुरावा करत आहे. परिसरात विमानतळासारखे मोठे प्रकल्प सुरू झाले आहेत. त्यामुळे भविष्यात मोठ्या प्रमाणात नागरीकरण वाढणार आहे. या सर्व नागरिकांना तसेच परिसराला आवश्यक त्या सुविधा देणे व त्यांच्या अडचणी दूर करण्यासाठी जबाबदारी भाजपची आहे आणि ही जबाबदारी भाजप पदाधिकारी खांद्यावर घेऊन काम करत आहेत.

या कार्यक्रमाचे आयोजन माजी सरपंच विजयश्री पाटील आणि शक्ती केंद्र प्रमुख संतोष पाटील यांनी केले होते. कार्यक्रमाला महिला, भगिनी महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. सहभागी महिलांसाठी आकर्षक बक्षिसे आणि खास लकी ड्रॉ आयोजित करण्यात आला होता. या वेळी लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते लकी ड्रॉ काढण्यात आला. यामध्ये प्रथम क्रमांकाचे पारितोषिक शोभा दवले यांना मिळाले असून त्यांना फ्रीज बक्षीस देण्यात आला. इतरही विजेत्या महिलांना बक्षिसे देऊन गौरवण्यात आले.

कार्यक्रमाला भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष प्रल्हाद केणी, पनवेल उत्तर मंडळ अध्यक्ष दिनेश खानावकर, निर्दोष केणी, संतोष पाटील, दीपक पाटील, नंदू म्हात्रे, लीना म्हात्रे, महिला मोर्चा अध्यक्ष आशा बोरसे, रमेश कदम, विनेश कदम, भूपेश कदम, नंदू भोपी, संतोष मढवी, राजेश पाटील, जयवंत घरत यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.



# आरसीएफ प्रकल्पग्रस्तांचे आंदोलन स्थगित

**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबागजवळच्या थळ येथील आरसीएफ प्रकल्पात उर्वरीत प्रकल्पग्रस्तांना सामावून घ्यावे यासाठी शिवसेनेने सुरू केलेले आंदोलन तूर्त स्थगित करण्यात आले आहे. न्यायालयाने घातलेली बंधने आणि दिवाळीचा सण यामुळे आंदोलन स्थगित करण्यात आले असले तरी आगामी काळात जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषणास बसणार असल्याची घोषणा आमदार महेंद्र दळवी यांनी केली आहे.



आरसीएफच्या १४१ प्रकल्पग्रस्तांना नोकरीत सामावून प्रश्नावर गेली ४० वर्षे वेगवेगळ्या माध्यमातून लढा सुरू आहे. शिवसेनेने १४ सप्टेंबर रोजी थळ येथील प्रकल्पाच्या प्रवेशव्दारासमोर रास्तारोको करून अलिबाग – रेवस मार्गावरील वाहतूक पाच तास रोखून धरली होती. आमदार महेंद्र दळवी यांच्या नेतृत्वाखालील या आंदोलनामुळे वातावरण तंग झाले होते. या प्रकरणी आमदार दळवी यांच्यासह शिवसेना पदाधिकारी यांचयावर गुन्हेही दाखल झाले. त्यानंतर दुसरयाचा दिवशी कंपनीच्या प्रवेश व्दारासमोर शिवसैनिकांनी साखळी उपोषण सुरू केलं होतं. आजपासून स्वतः महेंद्र दळवी साखळी उपोषणात सहभागी होणार होते, परंतु तूर्तास हे आंदोलन स्थगित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

आरसीएफ प्रकल्पग्रस्तांना सेवेत सामावून घेण्याचा मुद्दा सध्या न्यायप्रविष्ट आहे. त्यावर मुंबई उच्च न्यायालयात सुनावणी सुरू आहे. या सुनावणी दरम्यान कंपनीच्या परीसरात ५०० मीटर परीघाच्या अंतरात कुठलेही आंदोलन करण्यास न्यायालयाने प्रतिबंध केला आहे. त्यातच दिवाळीचा सणदेखील सुरू झाला आहे. या पार्श्वभूमीवर आज आमदार महेंद्र दळवी यांच्या उपस्थितीत आंदोलकांची बैठक झाली. या बैठकीत आंदोलनाची पुढची दिशा काय असेल यावर चर्चा झाली. विचार विनिमयाअंती सध्या आंदोलन थांबवण्याचा निर्णय घेण्यात आला.

आजच्या बैठकीला शिवसेना जिल्हाप्रमुख राजा केणी, अलिबाग तालुकाप्रमुख अनंत गोंधळी, जिल्हा खजिनदार सुरेश म्हात्रे, कामगार नेते दीपक रानवडे आदिंसह शिवसेना पदाधिकारी, प्रकल्पग्रस्त उपस्थित होते.

**सुनावणीदरम्यान न्यायालयाचे निर्देश आणि दिवाळीचा सण लक्षात घेऊन आम्ही आंदोलन तुर्तास स्थगित करण्याचा निर्णय घेतला आहे, परंतु आंदोलन थांबणार नाही. प्रकल्पग्रतांना सेवेत सामावून घेईपर्यंत लढा सुरूच राहील. लवकरच आपण जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरू करणार आहोत.**
**–महेंद्र दळवी, आमदार**

# पोलादपुरात अतिवृष्टीबाधित शेती पंचनामा प्रक्रिया सुरू

## तहसीलदार, तालुका कृषी अधिकाऱ्यांची बांधावर पाहणी

**पोलादपूर : प्रतिनिधी**

राज्यसरकारने जून ते सप्टेंबर २०२५ या कालावधीमध्ये राज्यात पडलेल्या अतिवृष्टीबाधित ३१ जिल्ह्यांतील २५३ तालुक्यांमधील शेतकऱ्यांना मदत देण्यासाठी पंचनामे करण्यासंदर्भात शासनआदेश जाहीर केला असून पोलादपूर तालुक्यात यापैकी शेतांचे पंचनामे तहसीलदार व तालुका कृषी अधिकारी यांच्या संयुक्त प्रयत्नाने सुरू करण्यात आले आहेत.



यंदाच्या खरीप हंगामात अतिवृष्टी व पुरामुळे शेतीपिकाचे नुकसान झाल्याचा पंचनामा सुरू झाला असताना शेतजमीन खरडून जाणे, विहिरीचे नुकसान, मनुष्य व पशुहानी, घर पडझड, घरातील वस्तू साहित्य नुकसान, वैयक्तिक तसेच सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान याबाबतचे पंचनामे सुरू होण्याची प्रतिक्षा पोलादपूर तालुक्यातील शेतकऱ्यांकडून होत आहे.

पोलादपूर तहसीलदार कपिल घोरपडे यांनी १५ ऑक्टोबरला तालुक्यात झालेल्या परतीच्या पावसानंतर तालुका कृषी अधिकारी वैशाली फडतरे यांच्यासोबत महाळुंगे गावातील शेतकऱ्याच्या तक्रारीनुसार पीकपंचनामा करण्यासाठी १७ ऑक्टोबर २०२५ रोजी शेतकऱ्याच्या शेताच्या बांधावर जाऊन पाहणी केली. या वेळी शेतकऱ्यांसमवेत तालुका कृषी कार्यालयाचे आत्मा समन्वयक कपिल पाटील तसेच रवींद्र गुंड व अन्य कृषीसहायक उपस्थित होते. यानंतर संपूर्ण तालुक्यात ग्रामसेवक, कृषी पर्यवेक्षक व सहायक तसेच तलाठी यांच्यामार्फत संयुक्त पंचनामे करण्यासाठी सुरूवात केली आहे.

९ ऑक्टोबर २०२५च्या शासननिर्णयानुसार २५३ तालुक्यांतील बाधितांना व आपदग्रस्तांना मदत देण्यासाठी विशेष मदत पॅकेज व सवलती लागू करण्यास शासन मान्यता देण्यात आली असून या शासन निर्णयानुसार शेतीपिकाच्या नुकसानीसाठी ३ हेक्टरच्या मर्यादेत जिरायत पिकांसाठी ८५०० रूपये प्रतिहेक्टरी, ३ हेक्टरच्या मर्यादेत आश्वासित सिंचनाखालील बागायत पिके हेक्टरी १७ हजार रूपये, ३ हेक्टरच्या मर्यादेत बहुवार्षिक पिके २२ हजार ५०० रूपये राज्य आपत्ती प्रतिसाद निधीचे दर व निकष असल्याचे नमूद करण्यात आले आहे.

# पनवेल कोळीवाड्यात रस्त्याच्या बाजूने काँक्रीट गटारे उभारा

## दर्शना भोईर यांची मागणी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल कोळीवाडा येथील रस्त्याच्या दोन्ही बाजुने काँक्रीट गटारे उभारण्यात यावे, अशी मागणी माजी नगरसेविका दर्शना भोईर यांनी पनवेल मनपा आयुक्तांकडे निवेदनाद्वारे केली आहे.

दर्शना भोईर यांनी निवेदनात म्हटले आहे की, पनवेल कोळीवाडा येथील कोळीवाडा ते कोळेश्वर शाळा या दरम्यानच्या रस्त्याच्या दोन्ही बाजुला जास्तीत जास्त क्षमतेची बंदीस्त गटार उभारण्यात यावीत जेणेकरुन सदरील गटारातील सांडपाणी रस्त्यावर वाहणार नाही व त्या ठिकाणी घाण पसरुन दुर्गंधी सूटणार नाही. पनवेल येथील कोळीवाडा येथील कोळीवाडा ते कोळेश्वर शाळा या दरम्यानच्या रस्त्याच्या दोन्ही बाजुला जास्तीत जास्त क्षमतेचे बंदीस्त गटार उभारण्यात यावे.

# उलवे येथून तरुण बेपत्ता

**पनवेल :** राहत्या घरातून एक तरुण कोठेतरी निघून गेल्याने तो हरवल्याची तक्रार उलवा पोलीस ठाणे येथे करण्यात आली आहे. लोकेश अशोक हिवाळे (वय २४ रा.उलवे) रंग सावळा, उंची पाच फूट दोन इंच, अंगात काळा शर्ट व जीन्स पॅन्ट घातलेली आहे. मिशी वाढलेली आहे. त्याला मराठी आणि हिंदी भाषा अवगत आहे. या तरुणाबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी उलवा पोलीस ठाणे (८६५५३५४१२१ / ७५०६०१२८९८) किंवा सहा पोलीस उपनिरीक्षक गणेश पाटील यांच्याशी संपर्क साधावा.

# घरफोडी करणारे दोघे ताब्यात

**पनवेल :** करंजाडे येथे घरफोडी करणाऱ्या दोघा जणांना पनवेल शहर पोलिसांनी पंत नगर परिसरातून ताब्यात घेतले आहे. जितेंद्र राजपुरोहित यांच्या करंजाडे येथील घरात अज्ञात चोरट्याने घरफोडी करून लाखो रुपये किमतीचा ऐवज चोरून नेला होता. याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात दाखल होताच वपोनि नितीन ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली सहा पोलीस निरीक्षक प्रवीण फडतरेव त्यांच्या पथकाने आरोपी मोहम्मद शेख (३० रा. मानखुर्द) व बाबर शेख (३२ रा. माहुल) या दोघांना ताब्यात घेतले आहे.

# वलपमध्ये 'दिवाळी पहाट'

**नवीन पनवेल :** पनवेल तालुक्यातील वलप गावामधे गतवर्षी प्रमाणे यावर्षी ही लक्ष्मी पूजनच्या शुभ मुहूर्तावर मंगळवार, २१ ऑक्टोबर २०२५ रोजी सकाळी ६:३० वा. गुरूवर्य शंकुनाथ बुवा पडघेकर, विष्णुबुवा वावंजेकर, पद्माकर बुवा खारघर, मधुकरबुवा धोंगडे यांच्या मार्गदर्शनाखाली जय हनुमान प्रासादिक भजन मंडळ व मित्र मंडळ वलप यांच्या विद्यमाने दिवाळी पहाटचे आयोजन करण्यात आले आहे. या वेळी गायक अमित पाटील खारघर, महेश पाटील पेनधर, राजाबुवा भोईर पडघे यांच्या मधुर आवाजात पखवाज साथ करतील कुमार केणी पेठाली व तबला ॲड. सुरज गोंधळी यांनी खेरणे ह्या संगीत मैफिलीचा सर्व नागरिकांनी आनंद घ्यावा, असे आवाहन ग्रामस्थ मंडळ वलपच्या वतीने करण्यात आले आहे.

# सराईत गुन्हेगाराकडून चोरीच्या दोन मोटरसायकली ताब्यात; चार गुन्हे उघडकीस

**पनवेल : वार्ताहर**

करंजाडे व परिसरात चैन स्नॅचिंगसह मोटरसायकली चोरणाऱ्या सराईत गुन्हेगारास पनवेल शहर पोलिसांनी ताब्यात घेणे असून त्यांच्याकडून आता पर्यंत चोरीच्या दोन मोटरसायकलीसह चैन स्नॅचिंगचे चार गुन्हे उघडकीस आणले आहेत.

गेल्या काही दिवसापासून चैन स्नॅचिंग व मोटार सायकलींच्या चोरीसंदर्भात काही गुन्हे पनवेल शहर पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आले होते. या संदर्भात पोलिसांच्या पथकाने गुप्त बातमीदार आणि तांत्रिक तपासाच्या आधारे आरोपी सलमान साजिद जाफरी उर्फ शेरू (वय २२, रा. आंबीवली) याला ताब्यात घेतले.

अधिक चौकशीमध्ये त्याने चोरलेल्या दोन मोटरसायकली ज्याची किंमत जवळपास एक लाख १५ हजार इतकी आहे व सोन्याचे दागिने ज्याची किंमत जवळपास ९५ हजार इतकी आहे, असा एकूण दोन लाख १० हजार रुपये किमतीचा ऐवज हस्तगत करण्यात आला असून पुढील तपास पनवेल शहर पोलीस करीत आहेत.

# कर्जतमध्ये आज फातिमा मातेची ९०वी तीर्थयात्रा

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत मधील ख्रिश्चन धर्मियांचे प्रार्थना मंदिर (चर्च) गेल्या काही दशकांपासून फातिमा माऊलीच्या नावाने प्रसिद्ध आहे. प्रत्येक वर्षी १३ ऑक्टोबरनंतर येणाऱ्या रविवारी (दि.१९) या मातेची तीर्थयात्रा असते. पूर्वी रेल्वे सेवेच्या फेऱ्या कमी होत्या त्यावेळी मध्य रेल्वे कडून काही विशेष गाड्या मुंबईहून कर्जतसाठी सोडण्यात येत असत. विशेष म्हणजे राज्यच नव्हे तर देश परदेशातूनही ख्रिश्चन बांधव या यात्रेसाठी आवर्जून उपस्थिती लावतात. या रविवारी १९ ऑक्टोबर रोजी ही तीर्थयात्रा असल्याने सध्या यात्रेची जय्यत तयारी चर्चचे फादर ज्यो डिमेलो यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

भाविकांच्या सेवेसाठी कर्जत परिसरातील ख्रिश्चन बांधवां बरोबरच कर्जतकर सुद्धा सज्ज आहेत. सकाळी सात वाजता मराठी, आठ वाजता कोकणी, नऊ वाजता मराठी, दहा वाजता इंग्रजी भाषेत भाविकांसाठी विषेष प्रार्थना अकरा वाजता यांच्या हस्ते ध्वजारोहण, त्यानंतर फातिमा मातेची वाजत गाजत पालखी मिरवणूक, दुपारी बारा वाजता फादर निल डॉस सांटोस यांचे बोधपर मार्गदर्शन, त्यानंतर स्नेह भोजन आणि आजारी भाविकांसाठी आरोग्यदायी प्रार्थना करून तीर्थ यात्रेचा समारोप करण्यात येणार असल्याची माहिती चर्चचे प्रमुख फादर ज्यो डिमेलो यांनी सांगितली.

# भिवपुरी रोड रेल्वेस्थानकाला जोडणारा रस्ता बनविण्यास सुरुवात

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातील डिकसळ गावावरून भिवपुरी रोड स्टेशन जाणारा रस्ता खराब होता. या रस्त्याच्या कामाची मागणी भिवपुरी रोड रेल्वे प्रवासी संघटना तसेच स्थानिक प्रवासी करीत होते.आमदार महेंद्र थोरवे यांच्या माध्यमातून रस्त्याच्या कामासाठी निधी देण्यात आला आहे. या कामाची सुरुवात झाली.



मध्य रेल्वेवरील कर्जत दिशेला असलेल्या भिवपुरी रोड रेल्वे स्थानकात येणारा रस्ता खराब झाला होता. उमरोली ग्रामपंचायत हद्दीतील डिकसळ येथे मोठ्या प्रमाणात वसाहती वाढत असून लोकलने प्रवास करण्यासाठी असलेला रस्ता डिकसळ येथून भिवपुरी स्थानकात जाण्यासाठी असलेल्या रस्त्याची दैनंदिन अवस्था झाली होती या रस्त्यासाठी सामाजिक कार्यकर्ते तसेच भिवपुरी रोड रेल्वे प्रवासी संघटना किशोर गायकवाड यांच्या पाठपुराव्याने आमदार महेंद्र थोरवे यांच्या माध्यमातून डिकसळ गावापासून ते भिवपुरी रोड स्थानकाकडे जाणाऱ्या रस्त्याच्या काँक्रिटीकरण कामाला सुरवात करण्यात आली आहे.

या रस्त्याचे काँक्रिटीकरण होणार असल्यामुळे येथील प्रवासी आणि स्थानिक रिक्षा चालक यांच्याकडून या रस्त्याच्या कामाची सतत मागणी होत होती. या रस्त्याचे काम व्हावे. याकरता कर्जत आमदार महेंद्र थोरवे यांना भिवपुरी रोड रेल्वे प्रवासी संघटना चे अध्यक्ष किशोर गायकवाड यांनी सतत पाठपुरावा सुरू ठेवला होता.

भिवपुरी रोड स्टेशनकडे जाणाऱ्या डिकसळ गावातून भिवपुरी रोड रेल्वे स्थानकात जाण्यासाठी असलेला रस्ता खड्ड्यात हरवला होता. आमदार महेंद्र थोरवे यांनी रस्त्याच्या कामासाठी निधी देऊन रस्त्याच्या कामाची सुरुवात झाली आहे. रस्त्याच्या कामांसाठी प्रवासी संघटनेचा पाठपुरावा सुरू होता.

या रस्त्याचे काम सुरू झाले असून भिवपुरी रोड रेल्वे प्रवासी संघटना रस्त्याचे काम चांगल्या दर्जाचे व्हावे यासाठी कामाच्या ठिकाणी उभे राहून काम करून घेत आहेत. कामाचा शुभारंभ झाला. या वेळी किशोर गायकवाड, रवींद्र राऊत, जय विजय पाटील, महेश कडव, राजेश विरले, नाना म्हसे आदी उपस्थित होते.

# रामशेठ ठाकूर कॉलेजमध्ये एमकेसीएल कोर्सेसचे ओरिएंटेशन

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात शनिवारी (दि.१७) एम.के.सी.एल समितीच्या वतीने महाराष्ट्र नॉलेज कॉर्पोरेशन लिमिटेड अंतर्गत महाविद्यालयात एमकेसीएलच्या वेगवेगळया कोर्सेससाठी नोंदणी केलेल्या विद्यार्थ्यांसाठी ओरिएंटेशन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.



या ओरिएंटेशनच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना डिजिटल शिक्षणाच्या नव्या वाटा आणि करिअरच्या संधी समजावून सांगण्यासाठी हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाचे उद्घाटन महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. माहेश्वरी झिरपे यांच्या हस्ते करण्यात आले.

या वेळी एम.के.सी.एल. प्रतिनिधी विश्वास मते एम.के.सी.एल एक्झिक्यूटिव्ह यांनी विद्यार्थ्यांना घेण्यात येणाऱ्या वेगवेगळ्या परीक्षांचा अभ्यासक्रम, परीक्षेचा पॅटर्न, तयारी विविध कौशल्ये, आधारित शिक्षणक्रमांची माहिती दिली तसेच परीक्षा उत्तीर्ण केल्यानंतर प्रमाणपत्र आणि नोकरीच्या संधी मिळतील असे नमूद केले. या कार्यक्रमामध्ये विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला तसेच विद्यार्थ्यांनी त्यांचे मत व्यक्त केली.

या कार्यक्रमाच्या शेवटी विद्यार्थ्यांसाठी शंका निरसन सत्र घेण्यात आले. या वेळी विद्यार्थ्यांच्या प्रश्नांना समाधानकारक उत्तरे देण्यात आली. या कार्यक्रमाचे आयोजन प्रा. मनीषा शिलेदार (समन्वयक, एम.के.सी.एल समिती यांनी केली तसेच प्रा. राहुल कांबळे, प्रा. स्नेहा नाईक व प्रा. योगिता पाटील तसेच इतर शिक्षक, विद्यार्थी व शिक्षकेतर कर्मचारी यांनी उपस्थित राहून सहकार्य केले.

# चाईल्ड केअरतर्फे बालसंस्कार केंद्रात अन्नदान

**उरण : बातमीदार**

चाईल्ड केअर सामाजिक संस्था रायगडतर्फे सावित्रीबाई फुले झोपडपट्टी उरण येथे अन्नदान व लहान मुलांना खाऊ वाटप करण्यात आले.

हा उपक्रम संस्थेचे संस्थापक, अध्यक्ष विकास कडू यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून नरेश म्हात्रे (रायगड भूषण), ॲड. विजेंद्र पाटील (कायदेशीर सल्लगार), पत्रकार विठ्ठल ममताबादे (चाईल्ड केअर सामाजिक संस्था मीडिया सल्लागार) उपस्थित होते. तर संस्थेतर्फे विकास कडू (संस्थापक, अध्यक्ष), मनोज ठाकूर (कार्याध्यक्ष), विक्रांत कडू (कार्याध्यक्ष), अभिषेक माळी (सदस्य), विवेक कडू (सदस्य) तसेच बासंस्कार केंद्रातील सेविका भारती पाटील, किरण घरत, प्रियांका घरत व सावित्रीबाई बाई फुले झोपडपट्टी मधील शेकडो महिला व बाल संस्कार केंद्र मधील ५० लहान मुले या कार्यक्रमांस उपस्थित होते.



या कार्यक्रमप्रसंगी सांस्कृतिक व कला क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या कलाकार किरण घरत (भेंडखळ) यांचा चाईल्ड केअर सामाजिक संस्था रायगड तर्फे सन्मान चिन्ह, प्रशस्तीपत्रक, पुष्पगुच्छ देऊन त्यांचा विशेष सन्मान करण्यात आले.

# उरण येथे उद्या 'दिवाळी पहाट'

**उरण :** महेश बालदी मित्र मंडळ वतीने दीपोत्सव उरणचा जल्लोष आनंदाचा दिवाळी पहाट कार्यक्रम सोमवारी (दि.२०) सकाळी ६ वाजता उरण नगर परिषदचे विमला तलाव येथे होणार आहे.

या कार्यक्रमासाठी गायक गणेशबुवा गोंधळी (वावंजे), गायिका संध्या घाडगे (पनवेल), गायिका स्नेहल पाटील (पारगाव) असणार आहेत. संगीत, संस्कृती, आणि सणांची सुंदर सांगड अनुभवायला विसरू नका या पहाटेच्या सुरेल मैफलीत समस्त उरण कारणानी सामील व्हावे, अशी विनंती आमदार महेश बालदी मित्र मंडळ यांनी केली आहे. या दीपावलीच्या शुभ दिनी उरणकरांसाठी संगीताची बहारदार मेजवानी मिळणार आहे. आमदार महेश बालदी यांची विशेष उपस्थिती राहणार आहे.

या कार्यक्रमासाठी महाराष्ट्र राज्य परिषद सदस्य रवी भोईर, माजी नगराध्यक्षा सायली म्हात्रे, माजी उपनगराध्यक्ष जयविन कोळी, उरण शहर भाजप अध्यक्ष तथा माजी नगरसेवक कौशिक शाह, राजेश ठाकूर, उरण शहर युवा अध्यक्ष निलेश पाटील आदी महेश बालदी मित्र मंडळ सदस्यांचे सहकार्य मिळणार आहे.



**श्रीवर्धन : दिवेआगर येथील यश सुधाकर पिळणकर या तरुणाने नारळाच्या झावळ्यांपासून आकाशकंदील बनवला आहे. हा आकर्षक व पर्यावरणस्नेही आकाशकंदील पाहण्यासाठी यशच्या घराजवळ अनेक जण गर्दी करत आहेत. दिवाळी पर्यावरणस्नेही साजरी करण्यात यावी हा संदेश देण्यासाठी यश पिळणकर या तरुणाने असा आकाशकंदील बनवला आहे.**

**दुखवटा**



# चंद्रभागा देसाई

**पाली :** सुधागड तालुक्यातील परळी विभागातील देसाई पाडा गावचे सामाजिक कार्यकर्ते, युवा उद्योजक सतीश पांडुरंग देसाई यांच्या मातोश्री चंद्रभागा देसाई (वय ८६) यांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात मुलगा, सून, नातवंड असा मोठा परिवार आहे. कै. चंद्रभागा देसाई यांचा दशक्रिया विधी उद्धर रामेश्वर येथे गुरुवारी (दि.२३) रोजी तर उत्तरकार्य विधी रविवारी (दि.२६) देसाईपाडा येथे होणार आहे. रविवारी (दि.२६) रायगड भूषण हभप योगीताताई थरकुडे (एमए बीएड) यांचे प्रवचन होणार आहे.

# नागरिकांच्या मूलभूत सुविधांना प्राधान्य

## आमदार प्रशांत ठाकूर यांचे प्रतिपादन; नवीन पनवेलमध्ये विविध विकासकामांचा शुभारंभ





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिकेच्या माध्यमातून नागरिकांच्या मूलभूत सुविधा देण्यासाठी प्राधान्य मिळत आहे. त्यामुळे येणाऱ्या कालावधीत आपण सर्वांनी नागरिकांच्या समस्या जाणून त्या सोडवण्याच्या दृष्टिकोनातून आणि जास्तीत जास्त सुविधा देण्यासाठी प्रयत्न करावे, असे प्रतिपादन आमदार प्रशांत ठाकूर यांनी नवीन पनवेल येथे शुक्रवारी (दि. १७) केले. या वेळी त्यांच्या हस्ते सुमारे दोन कोटी ३८ लाख रुपयांच्या विकासकामांचा शुभारंभ झाला.

पनवेल महापालिका क्षेत्रात आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली आणि माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली अनेक विकासाची कामे मार्गी लागून नागरिकांना विविध सुविधा उपलब्ध होत आहेत. त्यानुसार नवीन पनवेलमध्ये महापालिकेच्या माध्यमातून दोन कोटी ३८ लाख रुपयांच्या विकास कामांचा शुभारंभ शुक्रवारी झाला. यामध्ये ८३ लाख ८१ हजार ७४९ रुपयांच्या निधीतून नवीन पनवेल सेक्टर १४ येथील कालिका मंदिरासमोरील जुने नादुरुस्त गटार तोडून नव्याने बांधणे, ९९ लाख ३९ हजार ५७१ रुपयांच्या निधीमधून सेक्टर १३ ए टाईपमधील मलनिःस्सारण वाहिन्यांचे नूतनीकरण, ५६ लाख दोन हजार ६५० रुपयांच्या निधीमधून सेक्टर १४ इ वन टाईपमधील मलनिःस्सारण वाहिन्यांचे नूतनीकरणाच्या कामाचे भूमिपूजन तसेच सेक्टर १४ होल्डिंग पॉईंट येथे माजी नगराध्यक्ष संदीप पाटील यांच्या पाठपुराव्यामुळे उपलब्ध झालेल्या ओपन जिम आणि खेळण्यांच्या साहित्याचे लोकार्पण आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते झाले.

या कार्यक्रमास भाजपचे जिल्हा सरचिटणीस अ‍ॅड. प्रकाश बिनेदार, नवीन पनवेल मंडळ अध्यक्ष दशरथ म्हात्रे, माजी नगरसेवक अनिल भगत, अ‍ॅड. मनोज भुजबळ, माजी नगराध्यक्ष तथा नवीन पनवेल शहर उपाध्यक्ष संदीप पाटील, माजी नगरसेविका सुशिला घरत, अ‍ॅड. वृषाली वाघमारे, भाजप नेते जगदीश घरत, अ‍ॅड. जितेंद्र वाघमारे, युवा मोर्चा अध्यक्ष मयुर कदम, मंडळ उपाध्यक्ष नितीन चोरघे, विनायक कंकणवाडी, अभिजित दिवेकर यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक उपस्थित होते.



**पनवेल : दिवाळीनिमित्त भाजप नेते तथा महाराष्ट्र वाहतूक संघटनेचे अध्यक्ष प्रभूदास भोईर यांच्या वतीने नागरिकांसाठी उटणे वाटपाचा स्तुत्य उपक्रम आयोजित करण्यात आला आहे. या उपक्रमाचा शुभारंभ माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते झाला. या वेळी प्रभूदास भोईर यांच्यासह सुरेश भोईर, निलेश भोईर, प्रभाकर उलवेकर, कळमकर भोईर, शंकुनाथ भोईर, सुजित भगत, धनंजय भोईर, देवदास भोईर, राहुल उलवेकर, सूरज गोंधळी आदी उपस्थित होते.**



**पनवेल : भाजप कामोठे प्रभाग क्रमांक ११च्या वतीने दिवाळीनिमित्त सुगंधी उटण्याचे वाटप उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमाचा शुभारंभ आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते खांदा कॉलनी येथे झाला. या वेळी राज्य अल्पसंख्याक आयोगाचे सदस्य हॅप्पी सिंग, माजी नगरसेविका अरुणा भगत, सामाजिक कार्यकर्ते प्रदीप भगत, हरजिंदर कौर आदी उपस्थित होते.**

# दिवाळी अंकांमधून साहित्य-संस्कृतीची जपणूक

## लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे प्रतिपादन; विविध अंकांचे प्रकाशन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

दिवाळीच्या पारंपरिक प्रकाशोत्सवाबरोबरच साहित्यिक तेजाने उजळणारे विविध दिवाळी अंक हे समाजातील सृजनशीलतेचे प्रतीक आहेत. अशाच काही दर्जेदार दिवाळी अंकांचे प्रकाशन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते शनिवारी पनवेल येथे त्यांच्या निवासस्थानी पार पडले.

या सोहळ्यात अनिल रॉय संपादित 'स्टार पनवेल', दिपाली पारसकर यांचा 'युथ महाराष्ट्र', तसेच सनीप कलोते संपादित 'क्षितीज पर्व' या दिवाळी अंकांचे प्रकाशन करण्यात आले. या प्रसंगी ज्येष्ठ पत्रकार विजय कडू, संजय कदम, भारतीय जनता पार्टीचे महाराष्ट्र प्रदेश अल्पसंख्याक उपाध्यक्ष सय्यद अकबर, राज भंडारी, विशाल सावंत, आनंद पवार, गौरव जहागीरदार, चंद्रकांत शिर्के, केवळ महाडिक यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.





या वेळी लोकनेते रामशेठ ठाकूर म्हणाले की, दिवाळी अंक ही आपल्या साहित्य-संस्कृतीची जपणूक करणारी आणि विचारविनिमयाची महत्त्वपूर्ण परंपरा आहे. नवोदित लेखकांना आपले विचार समाजापर्यंत पोहोचवण्यासाठी हे व्यासपीठ प्रेरणादायी ठरते असे सांगितले तर संपादकांनी आपल्या-आपल्या अंकांची वैशिष्ट्ये आणि विषयांच्या मांडणीबद्दल उपस्थितांना माहिती दिली.



# आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते उटणे वाटप उपक्रमाचा शुभारंभ



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भाजप पनवेल शहराचे उपाध्यक्ष आणि सखी महिला मंडळाचे संस्थापक प्रीतम उर्फ पिंट्या म्हात्रे यांच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यंदाही दिवाळीच्या निमित्ताने सुगंधी उटण्याचे वाटप करण्यात आले. सलग तीन वर्षे हा उपक्रम यशस्वीरीत्या पार पडल्यावर यंदाचे हे चौथं वर्ष असून या उपक्रमाचा शुभारंभ शुक्रवारी आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आला.

या उपक्रमासोबतच प्रीतम म्हात्रे यांनी दिवाळीच्या पार्श्वभूमीवर घरगुती रांगोळी स्पर्धा, रिलीज स्पर्धा तसेच महिलांसाठी आणि मुलांसाठी विविध सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन केले आहे. समाजातील विविध घटकांना एकत्र आणून आनंद आणि स्नेहाचे वातावरण निर्माण करणे, हा या उपक्रमाचा मुख्य हेतू असल्याचे म्हात्रे यांनी सांगितले.

या वेळी आमदार प्रशांत ठाकूर म्हणाले की, देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी हे कर्मयोगी म्हणून देशसेवेसाठी झटत आहेत. ते स्वतः दिवाळी आपल्या सैनिकांसोबत सीमेवर साजरी करतात, हा त्यांचा सेवाभाव आपल्यासाठी प्रेरणादायी आहे. त्यांच्याच आदर्शावर कार्यकर्त्यांनी समाजात जाऊन लोकांशी दिवाळी साजरी करावी, हे अत्यंत स्तुत्य आहे. प्रीतम म्हात्रे यांनी या माध्यमातून समाजासाठी एक चांगला आदर्श निर्माण केला आहे. त्यांच्या या उपक्रमाला माझ्या शुभेच्छा आहेत.

कार्यक्रमाला प्रभाग क्रमांक १८ चे अध्यक्ष महेश सरदेसाई, सुधीर देसाई, माजी नगरसेविका नेता माळी, शहर मंडळ चिटणीस संजीवनी किल्ला, सचिन नागझरे, सखी महिला मंडळ अध्यक्षा रिया म्हात्रे, जोशना माळी, प्रीती निसार, सचिन शहा, पूर्वी निसार, अरविंद गाला, कृपा गाला, मनीषा गाला आदी उपस्थित होते.

# लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते नवीन गृहनिर्माण प्रकल्पाचे भूमिपूजन



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

दिवाळीच्या शुभमुहूर्तावर गव्हाण ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच विजय घरत यांच्या नक्षत्र हिरा या नवीन गृहनिर्माण प्रकल्पाचे भूमिपूजन शनिवारी मोठ्या उत्साहात पार पडले. माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते हा भूमिपूजन सोहळा संपन्न झाला.

उलवे नोड सेक्टर ९ प्लॉट नंबर ८६ या ठिकाणी सुरू होणारा हा नक्षत्र हिरा प्रकल्प परिसरातील नागरिकांच्या घरांची गरज पूर्ण करण्याच्या दृष्टीने महत्त्वाचा ठरणार आहे.

या वेळी रामशेठ ठाकूर यांनी विजय घरत यांच्या या नवीन उपक्रमाबद्दल अभिनंदन केले. या सोहळ्याला भाजपचे ज्येष्ठ नेते वाय. टी. देशमुख, हेमंत ठाकूर, वसंत पाटील, जयवंत देशमुख, वामनशेठ म्हात्रे, भार्गव ठाकूर, राजू खारकर, चिंतामण घरत, सुधीर ठाकूर, अनंता ठाकूर, अनिल देशमुख यांच्यासह परिसरातील अनेक मान्यवर, पदाधिकारी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



**पनवेल : रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षण विभागातर्फे सीकेटी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाला मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा पुरस्कार, सोबत पुरस्कार रक्कम पाच लाख रुपये व सन्मानचिन्ह देऊन नुकतेच गौरविण्यात आले. याबद्दल संस्थेचे चेअरमन लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी सीकेटी विद्यालयाचे मुख्याध्यापक कैलास सत्रे, प्राचार्य प्रशांत मोरे यांचे अभिनंदन केले.**



# दादासाहेब फाळके चित्रनगरी अठ्ठेचाळीस वर्षांची झाली..!

आपल्या देशातील चित्रपटसृष्टीत आपल्या महाराष्ट्रातील चित्रपटसृष्टीचे स्थान अतिशय गौरवास्पद आणि विशेष उल्लेखनीय. याच आपल्या चित्रपटसृष्टीतील मुंबईतील गोरेगाव पूर्व येथील दादासाहेब फाळके चित्रनगरी अनेक गोष्टींनी वैशिष्ट्यपूर्ण. याच चित्रनगरीला २६ सप्टेंबर रोजी अठ्ठेचाळीस वर्ष पूर्ण झाली असून आता अतिशय दमदारपणे या चित्रनगरीची सुवर्ण महोत्सवी वर्षाकडे वाटचाल सुरू आहे.

'सिनेमात जायचं, तर मुंबई गाठायला हवी' ही दीर्घकालीन सर्वसाधारण भावना आणि ती स्वाभाविक आहे. खरंतर आपल्या चित्रपटसृष्टीला नव्वदच्या दशकाच्या उत्तरार्धात बॉलीवूड म्हणणे सुरू झाले ते कार्पोरेट पिढीचे देणे. हॉलिवूडच्या धर्तीवर बॉलीवूड म्हणणे चुकीचे आहे. आणि आपल्या देशात मराठी, हिंदीसह लहान मोठ्या अशा दोन डझन प्रादेशिक भाषेतील चित्रपट निर्मिती होते आणि त्यातही 'चित्रपटाचा स्टुडिओ' ही जगभरातील चित्रपट रसिकांचा विलक्षण कुतूहलाची गोष्ट. चित्रपट संस्कृतीतील असे चित्रीकरणासाठीचे स्टुडिओ व प्रेक्षकांपर्यंत चित्रपट पोहोचतो ती चित्रपटगृह हा एक मोठाच प्रवास आहे.

याभोवती अनेक लहान मोठ्या गोष्टी गुंतल्यात, गुंफल्यात, विणल्यात, घडताहेत. 'शूटिंग कसे असते' याचं कुतूहल आणि 'स्टार कसे दिसतात' याची ओढ. सर्वसामान्य माणसाला चित्रपट विश्वाबद्दल कायमच विलक्षण कुतूहल व कौतुक. हा कधीचं न संपणारा असा भरपूर माहितीपूर्ण आणि मनोरंजक विषय.

याच बहुस्तरीय गोष्टीतील एक स्थळ, महाराष्ट्र राज्य शासनाची गोरेगाव पूर्व येथे असलेली तब्बल ५२० एकर जमीनीवरील प्रशस्त अशी दादासाहेब फाळके चित्रनगरी. मुंबईच्या वैभवातील एक मानाचे स्थान.

चित्रपट तर झालेच पण अगदी मालिका/रिॲलिटी शो/गेम शो/कौन बनेगा करोडपती/जाहिराती/व्हिडीओ अल्बम/वेबसिरिज/फोटो सेशन/ओटीटी कन्टेन यांच्या निर्मितीचे एक हक्काचे स्थान.

मी मीडियात १९८२ साली पाऊल टाकले आणि कायमच प्रत्यक्षातील चित्रपटसृष्टीत भटकंती, लहान मोठ्या भेटीगाठी व निरीक्षण यावर फोकस कायम ठेवला. पहिल्यांदा मी या चित्रनगरीत १९८३ साली भेट दिली. सुहास खडके अभिनित व दिग्दर्शित दोजख या चित्रपटाचे या चित्रनगरीत चित्रीकरण असताना सुहास खांडके यांच्या आमंत्रणावरून मी सर्वप्रथम या चित्रनगरीत पाऊल टाकले. त्या दिवशी अनुपम खेर आणि पल्लवी यांच्यावर काही दृश्ये चित्रित करण्यात आली. मी गिरणगावात लहानाचा मोठा होताना सिंगल स्क्रीन थिएटर अर्थात एकपडदा चित्रपटगृह (त्यात अनेकदा पडद्याजवळच्या पहिल्या चार रांगेतील स्टॉलचा हुकमी प्रेक्षक. हमखास टाळ्या शिट्यानी थिएटर डोक्यावर घेणार), गल्ली चित्रपट, मुंबई दूरदर्शनवर शनिवार संध्याकाळी मराठी चित्रपट आणि रविवार संध्याकाळी हिंदी चित्रपट पाहून मोठा झालेलो. मला आयुष्यात पहिल्यांदाच चित्रनगरीत पाऊल टाकण्यावर किती आणि केवढा आनंद झाला असेल याचा विचार करा. तेव्हापासून अगणित वेळा या चित्रनगरीत विविध कारणास्तव जातो आहे. त्यामुळे या चित्रनगरीबद्दल माझ्या आठवणी अनेक आणि त्यात केवढे तरी रंग. चित्रपटाच्या जगात फिरताना मी कधीच कंटाळा केला नाही. म्हणूनच मला पुस्तकाबाहेरचे व गुगलबाहेरचे मराठी व हिंदी चित्रपटाचे जग खोलवर माहीत आहे.










या चित्रनगरीत डोकावताना थोडसं फ्लॅशबॅकमध्ये...

दादासाहेब फाळके यांनी आपल्याकडचा पहिला चित्रपट 'राजा हरिश्चंद्र' निर्माण केला तो ३ मे १९१३ रोजी गिरगावातील कॉरोनेशन चित्रपटगृहात प्रदर्शित झाला. तो मूकपट आहे आणि तेव्हापासून आपल्याकडे मूकपटाची निर्मिती सुरु झाली. विशेष म्हणजे, 'राजा हरिश्चंद्र'साठी दादासाहेब फाळके यांनी दादरला पूर्व बाजूच्या मथुरा भवनमध्ये या चित्रपटाच्या निर्मीतीसाठी स्टुडिओ उभारला. तेथे त्यांनी तब्बल आठ महिने शूटिंग करीत हा चित्रपट पूर्ण केला. यामुळे मुंबईत मूकपटाची निर्मिती सुरु झाली. सुरुवातीच्या काळात असेच पौराणिक मूकपट निर्माण होत. मग नाशिक शहरात फाळके यांच्या कंपनीने मूकपट निर्मिती सुरू केली. पुणे शहरात पाटणकर फ्रेन्डस ॲण्ड कंपनीने संतपट निर्मिती सुरू केली. कोल्हापूरला प्रभात फिल्म कंपनीची स्थापना झाली. असे करता करता निर्मिती संस्था आणि शहरे वाढत गेली आणि त्यात मुंबईचे महत्त्व कायम राहिले. प्रभात फिल्म कंपनीनेच व्ही. शांताराम दिग्दर्शित 'अयोध्येचा राजा' या आपल्या पहिल्या मराठी बोलपटाची निर्मिती केली. १९३२ सालची ही गोष्ट आहे. ६ फेब्रुवारी १९३२ रोजी हा बोलपट गिरगावातील मॅजेस्टिक थिएटरमध्ये प्रदर्शित झाला. तत्पूर्वी अर्देशिर इराणी यांनी 'आलम आरा' हा पहिला हिंदी बोलपट मुंबईत निर्माण केला. तो १४ मार्च १९३१ रोजी गिरगावातील मॅजेस्टिक थिएटरमध्येच प्रदर्शित झाला. त्याची निर्मिती ग्रँड रोड परिसरातील ज्योती स्टुडिओत झाली. आता चित्रपट बोलू लागला. मूकपटाचा काळ आता मागे पडू लागला आणि बोलपटाचे युग हळूहळू आकार घेऊ लागले. देशाच्या इतर भागातही हळूहळू स्थानिक प्रादेशिक भाषेतील चित्रपट निर्मिती होऊ लागली. त्या काळात मुंबई, पुणे, कोल्हापूर, मद्रास (आताचे चैन्नई), लाहोर (आता पाकिस्तानात), कलकत्ता (आताचे कोलकत्ता) ही चित्रपट निर्मितीची मुख्य केंद्र होती. हे माध्यम व व्यवसाय हळूहळू आकार घेत होतो. मद्रासला दक्षिण भारतातील प्रादेशिक भाषेतील चित्रपटांची तर कोलकत्ता येथे बंगाली चित्रपटाची निर्मिती होई. मुंबई आणि लाहोर येथे हिंदी तर पुणे आणि कोल्हापूर येथे मराठी चित्रपटांची निर्मिती होई. फाळणीनंतर लाहोर पाकिस्तानला गेले. फाळणीच्या वेळी दोन्हीकडील अनेक हिंदी चित्रपट अर्धवटही राहिले. हाही एक विषय आहे.

आपण प्रामुख्याने मुंबईचा विचार करू. मुंबईत एकेक करत स्टुडिओ उभे राहत होते आणि चित्रपट निर्मितीची वाढ होत गेली. ती होताना देशाच्या विविध भागातून कलाकार, लेखक, कवी, गीतकार, संगीतकार, दिग्दर्शक, तंत्रज्ञ, कामगार मुंबईत येऊ लागले, कारण येथे संधी होती. हे माध्यम व व्यवसाय येथे मूळ धरत होते. त्याची वाढ होत होती. तीसच्या दशकात प्रभात (पुणे शहरात), न्यू थिएटर्स (कोलकत्ता) आणि बॉम्बे टॉकीज (मुंबईत) चित्रपट निर्मितीचा पाया रुजवला. बॉम्बे टॉकीजचा जन्म १९३६ सालचा मुंबईतीलच. चित्रपती व्ही. शांताराम यांनी १९४३ साली मुंबईत परेल येथे राजकमल कलामंदिर स्टुडिओची स्थापना केली. या स्टुडिओत शूटिंगपासून डबिंग, मिक्सिंग, रेकॉर्डिंग वगैरे सगळं करून तयार चित्रपट करून बाहेर यायचे अशी सुविधा. त्या काळात 'चित्रपट स्टुडिओ'ची ओळख अशीच होती.

मुंबईत एकेक करत स्टुडिओ उभे राहत जाताना एक गोष्ट झाल्याचे दिसते, चित्रपट निर्माता आणि दिग्दर्शकांनी आपला स्वतःचा स्टुडिओ असावा असा जास्त कल राहिला. त्या काळाशी ते सुसंगत होते. काही उदाहरणे सांगायची, तर राज कपूरने १९४८ साली चेंबुरला आर.के. स्टुडिओची स्थापना केली. कमाल अमरोही यांनी अंधेरीच्या महाकाली परिसरात भव्य कमालीस्थान स्टुडिओ उभारला. शशधर मुखर्जी यांनी अगोदर गोरेगावला फिल्मीस्थान तर अंधेरी पश्चिमेला आंबोली येथे फिल्मालय स्टुडिओ उभारला. मेहबूब खान यांनी वांद्र्याला मेहबूब स्टुडिओ उभारला. रामानंद सागर, शक्ती सामंता, प्रमोद चक्रवर्ती, एफ. सी. मेहरा आणि आत्माराम या पाच निर्मात्यांनी अंधेरी कुर्ला रोडवर नटराज स्टुडिओ उभारला. दादरला चंदुलाल शहा यांचाच रणजित स्टुडिओ, साकी नाकाजवळ हेमंत कदम या मराठी माणसाने चांदिवली स्टुडिओ उभारला. गुलशन रॉय यांचा त्रिमूर्ती स्टुडिओ दहिसर येथे सुरु झाला. या वाटचालीत मुंबईत आणखी काही चित्रपट शूटिंग स्टुडिओची संख्या वाढली

**झूम प्रहर**



**दिलीप ठाकूर**
चित्रपट समीक्षक

म्हणजेच मुंबईत चित्रपटसृष्टी खोल खोल रूजत गेली.त्यात आघाडीच्या निर्मिती संस्था मुंबईत होत्या. काही आदरयुक्त नावे सांगायची तर व्ही. शांताराम यांची राजकमल फिल्म, राज कपूरची आर.के. फिल्म, बिमल रॉय यांचे बिमल रॉय प्रॉडक्सन्स, आनंद बंधूंचे नवकेतन, त्यातीलच मग चेतन आनंदचे हिमालय फिल्म, बी.आर. चोप्रा यांची बी.आर. फिल्म, सोहराब मोदींचे मिनर्व्हा मुव्हीटोन तसेच मेहबूब खान, कमाल अमरोही, के. असिफ, रामानंद सागर याचे सागर आर्टस अशा अनेक निर्मात्यांनी मुंबईत सातत्याने चित्रपट निर्मिती केली. आज पाहिलं तर मुंबईतील अनेक जुने चित्रपट स्टुडिओ, सिंगल स्क्रीन थिएटर्स, चित्रीकरणाचे बंगले आणि जुन्या काळातील कलाकारांचे बंगलेही इतिहासजमा झाले आहेत.

आणि या सगळ्यात महत्त्वाचे आहे ते आपली दादासाहेब फाळके चित्रनगरी. सत्तरच्या दशकात महाराष्ट्र राज्य शासनाच्या पुढाकारातून ही भव्य चित्रनगरी उभी राहिली. १९७७ साली ती कार्यरत झाली. चित्रपटसृष्टीच्या वतीने चित्रपती व्ही. शांताराम यांनी यासाठी प्रतिनिधित्व केले. एकूण ५२० एकर जमीनीवर अतिशय विस्तीर्ण आणि अनेक प्रकारचे शूटिंग 'स्पॉट' असलेली ही एक प्रकारची संस्थाच. बोरीवलीतीच्या बाजूने पाह्यचे संजय गांधी राष्ट्रीय उद्यान आणि दुसरीकडे पहायचे ते गोरेगावचे आरेचे विशाल जंगल. या दोन्हीच्या दरम्यान ही वैशिष्ट्यपूर्ण चित्रनगरी. आज या चित्रनगरीला भेट देण्यासाठी देशभरातील पर्यटकांची वर्दळ वाढली आहे आणि ते स्वाभाविक आहे. मुंबई पाहायला जायचयं आणि मुंबईतील गेट वे ऑफ इंडिया, गिरगाव चौपाटी यापासून अमिताभ बच्चन, शाहरुख खान यांच्या बंगल्यासह चित्रनगरी पहायला हवीच. आपल्या देशात चित्रपट आणि क्रिकेट यांचे समाजातील विविध स्तरांवर वेड आहे, त्यात चित्रीकरणाचा स्टुडिओ व क्रिकेटचे स्टेडियम पाहण्याची विलक्षण ओढ आहे. चित्रपट व क्रिकेट हा अनेकांच्या जगण्यातील आनंद आहे.

चित्रनगरीचा आजपर्यंतचा प्रवास बहुस्तरीय, असंख्य आठवणी, गोष्टी, घटना, किस्से, कथा, दंतकथा, बातम्या असणारा असा आहे. चित्रनगरीच्या मुख्य प्रवेशद्वारापासून ते हेलिपॅडपर्यंत आणि मिनी थिएटरपासून गार्डनपर्यंत असा हा बहुरंगी, बहुढंगी असा हा प्रवास आहे. काही वर्षांपूर्वी मिनी थिएटर पाडले गेले आहे. याच मिनी थिएटरमध्ये संजय लीला भन्साळी दिग्दर्शित हम दिल दे चुके सनम, कमल हसन दिग्दर्शित हे राम, राकेश रोशन दिग्दर्शित कहो ना प्यार है, करण जोहर दिग्दर्शित माय नेम इज खान अशा अनेक चित्रपटाचे आम्हा चित्रपट समीक्षांसाठीचे खेळ आयोजित करण्यात आले होते. ही विशेष आठवण.

यश चोप्रा दिग्दर्शित 'परंपरा', सुभाष घई दिग्दर्शित 'कर्मा'पासून एन. चंद्रा दिग्दर्शित हमला. संजय लीला भन्साली दिग्दर्शित 'हम दिल दे चुके सनम'पर्यंत आणि डॉ. जब्बार पटेल दिग्दर्शित 'एक होता विदूषक', गिरीश घाणेकर दिग्दर्शित 'रंगत संगत'पासून रमेश देव दिग्दर्शित 'जीवा सखा', श्रावणी देवधर दिग्दर्शित 'सरकारमाना'पर्यंत अनेक मराठी व हिंदी चित्रपटांचे शूटिंग याच चित्रनगरीत झाले.

सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यांच्या उपस्थितीत दादासाहेब फाळके चित्रनगरीच्या ४८व्या वर्धापन दिन साजरा करण्यात आला. महामंडळाच्या ४८व्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून चित्रपताका या त्रैमासिकाच्या पहिल्या अंकाचे प्रकाशन मंत्री आशिष शेलार यांच्या हस्ते करण्यात आले. महामंडळाच्या विविध योजना, सेवा, उपक्रम यांची माहिती देण्यासाठी तसेच चित्रपट, रंगभूमी व सांस्कृतिक क्षेत्रातील घडामोडीची दखल घेण्याच्या उद्देशाने महामंडळाकडून चित्रपताका या त्रैमासिकाची सुरुवात करण्यात आली आहे. शुक्रवारी वर्धापन दिनाच्या कार्यक्रमात या त्रैमासिकाच्या शुभारंभाच्या अंकाचे प्रकाशन झाले.

आपल्या चित्रनगरीचा प्रवास चौफेर व वैशिष्ट्यपूर्ण. आणखी दोन वर्षांनी पन्नास वर्षे अर्थात सुवर्ण महोत्सवी वर्ष पूर्ण होत आहेत. आपल्या महाराष्ट्रासाठी ही गौरवास्पद अशीच वाटचाल आहे.

# दिन दिन दिवाळी...





दिवाळी हा पाच दिवसांचा उत्सव आहे, जो दिव्यांचा उत्सव म्हणून ओळखला जातो. अंधारावर प्रकाशाचा, वाईटावर चांगल्याचा आणि अज्ञानावर ज्ञानाच्या विजयाचे प्रतीक म्हणून दीपावलीला ओळखले जाते. हिंदू धर्माबरोबरच प्रकाशपर्वाच्या रूपात इतर भारतीय धर्मांमध्येही दिवाळी साजरी केली जाते.

अश्विन वद्य नवमी या दिवसापासून दिवाळीची तयारी सुरू करतात. काही लोक नंतर आणि काही लोक अगोदर आपल्या दिवाळीच्या कामाची तयारी करतात. त्याचे कारण असे आहे की, ज्याचा जसा कामाचा व्याप कमी जास्त असेल तो त्याप्रमाणे तयारीला सुरुवात करत असतो.

उत्तर भारतात मातीच्या दिव्यांच्या रांगा लावून रावणाचा पराभव केल्यानंतर राजा रामाच्या अयोध्येला परत आल्याची दिवाळी साजरी करतात. याच दिवशी एका युगाच्या फरकाने भगवान श्रीकृष्णाने नरकासुराचा पराभव केला तो दिवस दक्षिण भारतासह संपूर्ण भारत वर्ष हा दिवाळीचा सण साजरा करतो.

दिवाळी आपल्या जीवनातील अंधार दूर करणे आणि दिवे आणि आशीर्वादांचे शोषण दर्शवते. पावसाळ्यानंतर नवा ऋतू येण्याचे संकेतही ते देतात. लोक त्यांच्या दारात अनेक रंग वापरून रांगोळ्या काढतात, नवीन कपडे घालतात, दार आणि खिडक्या उघडतात आणि समृद्धी आणि संपत्तीचे स्वागत करण्यासाठी रात्रभर दिवे लावतात.

दिवाळीतील प्रत्येक दिवसाचे एक वेगळे महत्त्व असते. त्यातील एक म्हणजे बसुबारस, जी नुकतीच साजरी झाली. वसु म्हणजे द्रव्य (धन) त्यासाठी असलेली बारस म्हणजे द्वादशी. या दिवसाला गोवत्स द्वादशी असेही म्हणतात. या दिवशी संध्याकाळी गाईची वासरासह पूजा करतात. घरात लक्ष्मीचे आगमन व्हावे या हेतूनेही या दिवशी सवत्स धेनूची पूजा करण्याची पद्धत आहे. ज्यांच्याकडे घरी गुरे, वासरे आहेत त्यांच्याकडे या दिवशी पुरणाचा स्वयंपाक करतात.

धनत्रयोदशी या सणामागे एक मनोवेधक कथा आहे. कथित भविष्यवाणीप्रमाणे हेमा राजाचा पुत्र आपल्या सोळाव्या वर्षी मृत्युमुखी पडणार असतो. आपल्या पुत्राने जीवनाची सर्व सुखे उपभोगावीत म्हणून राजा व राणी त्याचे लग्न करतात. लग्नानंतर चौथा दिवस हा तो मृत्युमुखी पडण्याचा दिवस असतो. या रात्री त्याची पत्नी त्यास झोपू देत नाही. त्याच्या अवतीभवती सोन्या-चांदीच्या मोहरा ठेवल्या जातात. महालाचे प्रवेशद्वारही असेच सोन्या-चांदीने भरून रोखले जाते. सर्व महालात मोठमोठ्या दिव्यांनी लखलखीत प्रकाश केला जातो. वेगवेगळी गाणी व गोष्टी सांगून पत्नी त्याला जागे ठेवते. जेव्हा यम राजकुमाराच्या खोलीत सर्परूपात प्रवेश करण्याचा प्रयत्न करतो तेव्हा त्याचे डोळे सोन्या-चांदीने दिपतात. या कारणास्तव, यम आपल्या जगात (यमलोकात) परततो. अशा प्रकारे राजकुमाराचे प्राण वाचतात अशी आख्यायिका आहे. म्हणूनच या दिवसास यमदीपदान असेही म्हणतात. या दिवशी सायंकाळी घराबाहेर दिवा लावून त्याच्या वातीचे टोक दक्षिण दिशेस करतात. त्यानंतर त्या दिव्यास नमस्कार करतात. याने अपमृत्यू टळतो असा समज आहे.

धनत्रयोदशीबद्दल अजून एक कथा आहे. इंद्रदेवाने महर्षि दुर्वास यांच्या शाप निवारणाकरिता समुद्र मंथन केले, तेव्हा त्यातून देवी लक्ष्मी प्रगट झाली तसेच समुद्र मंथनातून धन्वंतरी अमृतकुंभ बाहेर घेऊन आला. म्हणून धन्वंतरीचीही या दिवशी पूजा केली जाते. धन्वंतरी हा वैद्यराज असून त्याच्या हातातील कमंडलू अमृताने भरले आहे.

आयुर्वेदाच्या दृष्टीने हा दिवस धन्वंतरी जयंतीचा आहे. वैद्य मंडळी या दिवशी धन्वंतरीची (देवांचा वैद्य) पूजा करतात. लोकांस प्रसाद म्हणून कडुनिंबाच्या पानांचे बारीक केलेले तुकडे व साखर असे लोकांना देतात. या दिवशी वस्त्रालंकार खरेदी करणे शुभ मानतात. उपवास करून घरातले द्रव्य व अलंकार पेटीतून काढून ते साफसूफ करतात. कुबेर, विष्णू-लक्ष्मी, योगिनी, गणेश, नाग आणि द्रव्यनिधी यांची पूजा करून पायसाचा नैवेद्य दाखवितात. हा दिवस भारतात राष्ट्रीय आयुर्वेद दिवस म्हणूनही साजरा होतो.

नरक चतुर्दशीशी संबंधित नरकासुरवधाचे चरित्र प्रचलित आहे. या दिवशी कृष्णाने नरकासुराचा वध करून प्रजेला त्याच्या जुलुमी राजवटीतून सोडवले. नरकासुराने तप करून ब्रह्मदेवाला प्रसन्न करून घेतले व अवध्यत्वाचा म्हणजेच कुणाकडूनही वध होणार नाही असा वर मागून घेतला. त्या वराच्या योगाने त्याने अनेक राजांना हरवून त्यांच्या कन्या व त्या राज्यांतील स्त्रियांचे अपहरण केले. नरकासुराने अश्या एकूण १६,१०० स्त्रियांना पळवून नेले व मणिपर्वतावर एक नगर वसवून त्यात त्यांना बंदी बनवून ठेवले. त्याने अगणित संपत्ती लुटली व अश्याच हावेपोटी त्याने देवमाता अदितीची कुंडले व वरुणाचे विशाल छत्रही बळकावले. त्याला मिळालेल्या वरामुळे तो देव, गंधर्व व मानवांना तापदायक झाला होता. अनेक गिरिदुर्गांनी वेढलेले प्राग्ज्योतिषपूर हे नगर त्याची राजधानी होती. ही राजधानी अनेक वेगवेगळ्या प्रकारच्या खंदकांनी, अग्नी, पाणी इत्यादींनी वेढलेली होती. या दुर्जय राजधानीवर कृष्णाने गरुडावर स्वार होऊन चाल केली. कृष्णाने नरकासुराच्या देहाचे दोन तुकडे करत त्याचा वध केला. नरकासुरवधाने देवादिकांना, तसेच प्रजेला आनंद झाला. नरकासुराच्या बंदिवासातील कुमारिकांना त्यांचे स्वजन स्वीकारणार नाहीत, हे जाणून कृष्णाने या १६,१०० कन्यांसोबत विवाह केला व त्यांना सामाजिक प्रतिष्ठा मिळवून दिली. कृष्णाच्या पराक्रमाचे स्मरण म्हणून आश्विन कृष्ण चतुर्दशीस नरक चतुर्दशी हा सण साजरा केला जातो.

नरकचतुर्दशीच्या दिवशी अलक्ष्मीचे पहाटे मर्दन करून आपल्यातील नरकरूपी पापवासनांचा नायनाट व अहंकाराचे उच्चाटन करायचे आहे. तेव्हाच आत्म्यावरील अहंचा पडदा दूर होऊन आत्मज्योत प्रकाशित होईल असा यामागील संकेत आहे. या दिवशी अभ्यंगस्नानाचे महत्त्व असते. सकाळी लवकर उठून, संपूर्ण शरीरास तेलाचे मर्दन करून, सुवासिक उटणे लावून, सूर्योदयापूर्वी केलेले स्नान म्हणजे अभ्यंगस्नान. या दिवशी पहाटे यमासाठी नरकात, म्हणजे आधुनिक परिभाषेत घरातील आदल्या दिवशी घासून पुसून स्वच्छ केलेल्या स्वच्छतागृहात पणती लावण्याची प्रथा आहे.

दिवाळीत लक्ष्मीची पूजा केली जाते, सामान्यतः अमावस्या तिथी अशुभ मानली जाते, परंतु धर्मग्रंथ आणि हिंदू धर्मानुसार दीपावलीच्या काळात येणारी अमावस्या उदार आणि समृद्धी-उत्तम मानली जाते. दीपावलीच्या काळात श्री महालक्ष्मीची पूजा करण्याचा कायदा आहे. असे मानले जाते की दीपावलीच्या रात्री म्हणजेच अमावस्या तिथीच्या मध्यरात्री श्री लक्ष्मी सज्जनांच्या घरी येते. सर्व दुर्गुणांपासून मुक्तीचा मार्ग असलेल्या श्री गणेश भगवान सोबत श्री लक्ष्मीजींची विशेष पूजा केली जाते.

या दिवशी लोक स्वच्छता करण्यासाठी लागणारी नवी केरसुणी विकत घेतात. तिलाच लक्ष्मी मानून तिच्यावर पाणी घालून हळदकुंकू वाहून घरात वापरण्यास सुरुवात करतात. केरसुणीने घर स्वच्छ होवून घरातील अलक्ष्मी म्हणजे दारिद्र्य दूर होते असे मानले जाते.

कार्तिक शुद्ध प्रतिपदेस बलिप्रतिपदा साजरी केली जाते. हा दिवस दिवाळी पाडवा म्हणून ही ओळखला जातो. या दिवशी बळी राजाचे रांगोळीने चित्र काढतात व त्याची पूजा करतात आणि 'इडा पीडा टळो व बळीचे राज्य येवो' असे म्हणतात. साडेतीन मुहूर्तातील एक मुहूर्त म्हणून या दिवसाला विशेष महत्त्व आहे.

कार्तिक शुद्ध द्वितीयेस भाऊबीज साजरी होते. या दिवशी यम आपली बहीण यमी हिच्या घरी जेवायला गेला, म्हणून या दिवसाला यमद्वितीया असे नाव मिळाले. बंधू-भगिनींचा प्रेमसंवर्धनाचा हा दिवस आहे. या दिवशी बहिणीच्या घरी भाऊ गोडधोड भोजन करतो आणि सायंकाळी चंद्राची कोर दिसल्यानंतर बहीण प्रथम चंद्रकोरीस व नंतर भावाला ओवाळते. भाऊ मग ओवाळणीच्या ताटात 'ओवाळणी' देऊन बहिणीचा सन्मान करतो. भावा-बहिणीच्या नात्याचा एक तरी सण प्रत्येक समाजात असतोच. अशा प्रकारे दिवाळी सर्वत्र साजरी होते.

दिवाळीत संध्याकाळच्या वेळी मुले कुटुंबियांसह किंवा मित्रांसोबत फटाके फोडण्याचा आनंद लहान मुले घेतात. याशिवाय किल्ले बनवतात, विविध खेळ खेळतात. मोठी मंडळी खरेदी करतात, महिलांनी केलेल्या फराळावर ताव मारतात. एकंदर आबालवृद्ध दिवाळीचा मनसोक्त आनंद घेतात. (साभार : इंटरनेट)

# वयाळ ग्रामस्थांचे आंदोलन तात्पुरते स्थगित

## लोधीवलीपर्यंतच्या रस्त्याची पाहणी होणार -खालापूर तहसीलदार

**चौक : प्रतिनिधी**

वयाळ ते लोधीवली या रस्त्याबाबत खालापूर तहसीलदार अभय चव्हाण यांनी त्यांच्या दालनात बैठक घेऊन दोन्ही विभागाणी प्रत्यक्ष पाहणी करून कृती करण्याचे निर्देश दिल्याने तूर्तास ग्रामस्थ वयाळ यांचे आंदोलन तात्पुरते स्थगित करण्यात आले आहे.



गेली तीन ते चार वर्षे लोधीवली ते वयाळ या रस्त्याची दयनीय अवस्था महाराष्ट्र जीवन प्राधिकरण व सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्या मुळे झाली, मात्र याचा त्रास परिसरातील विशेषता वयाळ ग्रामस्थ यांना आजही होत आहे. दोन विभागांच्या लढाईत ग्रामस्थ पिचलेल्या अवस्थेत आहेत. खालापूर तालुक्यातील वयाळ ते लोधिवली रस्ता शेवटची घटका मोजून झाली आहे.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांच्या नवीन पाईप लाईन मुळे हा रस्ता खराब होताना दिसत आहे,तर हा रस्ताच आमच्या मालकीचा असल्याचा दावा महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी केला आहे. मागील काही वर्षात शासनाने यावर निधी खर्च केला आहे, मग आताच महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांना मालकी आठवली? असा प्रश्न निर्माण झाला आहे.

प्राधिकरण व सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्यातील वाद मिटणार नाही, यामुळे ग्रामस्थ यांनी तहसीलदार अभय चव्हाण यांची भेट घेऊन हा विषय मार्गी लावण्याची विनंती केली असता तहसीलदार अभय चव्हाण यांच्या दालनात बैठक घेण्यात आली. तीन वर्ष पाईप लाईनचे काम सुरू आहे. रस्त्याची अवस्था पूर्णपणे असुरक्षित व खराब झाली आहे. याच मार्गावर शाळा आहेत, पावसाळ्यात याची अवस्था बिकट झाली होती, विद्यार्थी यांच्या जीविताला धोका निर्माण झाल्याचे सांगण्यात आले.

खालापूर तहसीलदार अभय चव्हाण यांनी याबाबत स्पष्ट निर्देश करून नोहेंबर महिन्यात स्थळ पाहणी व काम सुरू होईल याबाबत स्पष्ट निर्देश दिले. तहसीलदार अभय चव्हाण यांनी केलेल्या मध्यस्थी मुळे आजचे तीव्र आंदोलन तात्पुरते स्थगित करण्यात आले आहे. या बैठकीस महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, पंचायत समिती खालापूर, सार्वजनिक बांधकाम विभाग, निवासी नायब तहसीलदार सुधाकर राठोड, मंडळ अधिकारी माणिक सानप, ग्राम महसूल अधिकारी मधुसूदन पंपटवार, ग्रामपंचायत अधिकारी गोकुळदास राठोड, सरपंच रमेश गायकवाड, विनोद भोईर, देवा पवार, उपसरपंच रोशन गायकवाड, प्रमोद पवार, अनिल पवार, अर्जुन पवार, समीर म्हात्रे, रूपेश पवार, अक्षय म्हात्रे, देवा पवार, नितीन ठाकूर, भूषण म्हात्रे आदी उपस्थित होते.

## गुन्ह्यातील साहित्य जप्त

**नागोठणे : बातमीदार**

नागोठणे पोलीस स्टेशनच्या हद्दीतील वासगावकडे जाणाऱ्या रस्त्यालगत झालेल्या पेण तालुक्यातील पाबळ खोऱ्यातील गौळावाडी येथील तरुण कृष्णा नामदेव खंडवी वय २३ वर्ष याचा शुक्रवार, १० ऑक्टोबर रोजी केलेल्या खुन प्रकरणात वापरलेले गेलेले साहित्य ओढणी, मोटारसायकल, लेस, बूट याचा नागोठणे पोलिसांनी तपास करून जप्त केले असून खुन केल्यानंतर मयत तरुणाची ओळख पुसली जावी म्हणून त्याच्या चेहरा व अंगावर टाकण्यात आलेले केमिकलचा नागोठणे पोलिस कसून तपास करीत आहेत.

दरम्यान, अत्यंत क्लिष्ट व गंभीर स्वरूपाचा गुन्हा रायगड जिल्हा पोलीस अधिक्षक आँचल दलाल, अपर पोलीस अधिक्षक अभिजित शिवथरे,उपविभागीय पोलीस अधिकारी रोहा प्रसाद गोकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली नागोठणे पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी सहा. पोलीस निरीक्षक सचिन कुलकर्णी व त्यांची टीम यांनी केलेल्या कौतुकास्पद कामगिरी बद्दल सर्व स्थरातून कौतुक होत आहे.

मयत कृष्णा खंडवी याच्या खुन प्रकारणातील आरोपी दिपाली अशोक निरगुडे (मयताची पत्नी) (वय १९ वर्ष, रा. मोहाडी वाडी पो. पाबळ ता. पेण), प्रियकर उमेश सदु महाकाळ (वय २१ वर्ष रा. बारीमाळ पो. ओझरखेड ता. त्रंबकेश्वर जिल्हा नाशिक) व प्रियंकराची मैत्रीण सुप्रिया प्रकाश चौधरी (वय १९ वर्षे रा. आडगावदेवळा, पो. शिरस्ता, ता. त्रंबकेश्वर जि. नाशिक) यांना नागोठणे पोलिसांनी शुक्रवारी ( दि. १७) रोहा येथील फौजदारी न्यायालयात हजर केले असता तिनही आरोपींना रविवार दि. १९ ऑक्टोबर पर्यंत पोलिस कोठडी सुनावली आहे.

नागोठणे पोलीस रविवारी तीनही आरोपींना पुन्हा रोहा येथील फौजदारी न्यायालयात हजर करणार असून अधिक तपासासाठी पुन्हा पोलीस कोठडी मागणार असल्याचे नागोठणे पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी सचिन कुलकर्णी यांनी सांगितले.

## माथेरानला आलेला पर्यटक बेपत्ता

**माथेरान : प्रतिनिधी**



कर्नाटक बेंगलोर येथून माथेरानच्या पर्यटनासाठी आलेले ५८ वर्षीय शानमुगा सुंदरम बालसुब्रमण्यम ही व्यक्ती १५ ऑक्टोबर रोजी सकाळी ७ वाजता माथेरानमधल्या वरांडा इन द फॉरेस्ट (बार हाऊस) या नामांकित हॉटेलमधून पॉईंट फिरण्यासाठी म्हणून हॉटेलच्या परिसरातून बाहेर निघून गेलेत आणि ते बाहेर जात असताना सीसीटीव्ही फुटेजदेखील समोर आले, मात्र आपल्या हॉटेलमध्ये वास्तव्यास असलेले पर्यटक पुन्हा आपल्या रूममध्ये न आल्याचे लक्षात येताच येथील हॉटेल व्यवस्थापनाने

शानमुगा सुंदरम बालसुब्रमणयम यांचा आसपासच्या पॉईंट परिसरात तसेच अन्य ठिकाणी शोध घेण्यात आला, मात्र त्यांचा कुठेच थांगपत्ता लागत नसल्यामुळे अखेर त्यांनी माथेरान पोलीस ठाण्यात बालसुब्रमणयम बेपत्ता असल्याबाबत हॉटेल व्यवस्थापनाकडून फिर्याद दाखल करण्यात आली आहे.

माथेरान पोलिसांनी समाज माध्यमांवर या संदर्भात माहिती प्रसारित करून या हरवलेल्या व्यक्तीचा शोध घेण्याचा प्रयत्नदेखील केला, मात्र अद्याप या व्यक्तीचा तपास लागला नसून माथेरान पोलीस तपास करीत आहेत.

## जिल्हास्तरीय किल्ला बांधणी स्पर्धा

**धाटाव : प्रतिनिधी**

अखंड बहुजन समाजातील तरुण मुख्यतः लहानग्यांना इतिहासाचे स्मरण व्हावे, युगपुरुष छत्रपती शिवरायांच्या कार्याचा जागर व्हावा, गड किल्ल्यांची बांधणी, स्वराज्यातील किल्ल्यांचे महत्त्व उमजावे यासाठी रोहा सकल मराठा समाज मागील ७ वर्षापासून रोहा तालुका स्तरीय भव्य किल्ला बांधणी स्पर्धांचे आयोजन करत आला आहे.

यावर्षी दक्षिण रायगड जिल्हा स्तरीय भव्य किल्ला बांधणी स्पर्धांचे आयोजन करण्यात आल्याची माहिती अध्यक्ष आप्पा देशमुख यांनी दिली. किल्ला बांधणी स्पर्धेतील उत्साह आणि गडकिल्ल्यांची माहिती जनजागृती पाहता भव्यदिव्य किल्ला बांधणी स्पर्धेचे नियोजन केले आहे. यात रोहा, मुरुड, माणगांव, तळा, महाड, पोलादपूर, म्हसळा, श्रीवर्धन तालुक्यांचा सहभाग आहे. तरीही पेण, अलिबाग अन्य तालुक्यातील अनेक स्पर्धकांनी किल्ला स्पर्धेसाठी नोंदणी केली आहे, अशी अधिक माहिती स्पर्धा प्रमुख समीर दळवी, सचिन दळवी व स्पर्धा प्रमुखांनी दिली.

रोहा तालुका सकल मराठा समाज आयोजित दक्षिण रायगड जिल्हा स्तरीय भव्यदिव्य किल्ला बांधणी स्पर्धा अधिक माहितीपूर्ण, तांत्रिक बांधणी रचनेतून व्हावे, तरुण, लहान मुलांना गड किल्लांबद्दल महत्वपूर्ण बारीक सारीक माहिती असावी असाच प्रयत्न किल्ला बांधणी स्पर्धेतून आहे. जिल्हास्तरीय संकल्पनेतून स्पर्धा खूपच व्यापक झाली. त्यामुळे गडकिल्ले बांधणी स्पर्धेसाठी अटीशर्ती घालण्यात आली. किल्ला आपला घर, परिसरात असावा परीक्षण ऑनलाईन पद्धतीने केले जाईल, किल्ल्याची बांधणी व माहिती देणाऱा व्हिडिओ पाठवावा, निवडक किल्ल्यांचे प्रत्यक्ष परीक्षण केले जाईल, कार्यक्रमात बदल करण्याचा अधिकार आयोजकांना असेल.

काल्पनिक किल्ल्यांचे परीक्षण केले जाणार नाही. किल्ल्यांचा व्हिडिओ २५ ऑक्टोबर पर्यंत पाठवावा. प्रथम क्रमांक ८ हजार व सन्मानचिन्ह, द्वितीय क्रमांक ६ हजार व सन्मानचिन्ह, तृतीय क्रमांक ४ हजार व सन्मानचिन्ह, उत्कृष्ट किल्ले बांधणी २ हजार व सन्मानचिन्ह, उत्तेजनार्थ १ रक्कम १ हजार १ रुपया व सन्मानचिन्ह, उत्तेजनार्थ २ रक्कम १ हजार १ रुपये व सन्मानचिन्ह, उत्तेजनातील ३ रक्कम १ हजार १ रुपये व सन्मानचिन्ह स्पर्धा वितरण कार्यक्रमात देण्यात येणार आहे. सर्व बहुजन समाजातील तरुण, लहानग्यांनी किल्ला बांधणी स्पर्धेत सहभाग घ्यावा, उज्वल इतिहासाचा जागर व्हावा असे आवाहन अध्यक्ष आप्पा देशमुख यांनी केला.

अधिक माहितीसाठी समीर दळवी ९२२६९३५६६३, सचिन दळवी ८७९६९२९३६०, अरुण साळुंखे ८०८७४३१६६४, संकल्प धनावडे ९९७५५८६४४० येथे संपर्क साधावा असे दळवी बंधू यांनी सांगितले. दरम्यान, सकल मराठा समाजाच्या किल्ला बांधणी स्पर्धा ऐतिहासिक परंपरेचा भाग झाल्याचे अधोरेखीत झाले आहे.

## इंदरदेव धनगरवाडीसंदर्भात सुतारवाडी येथे बैठक

**नागोठणे : बातमीदार**

रोहा तालुक्यातील इंदरदेव धनगरवाडीतील वस्तीला काही महिन्यांपूर्वी आग लागून ४९ घरे जळून भस्मसात झाली होती. शासनाकडे पाठपुरावा करूनही ग्रामस्थ मदतीपासून वंचित राहिले म्हणून इंदरदेव धनगरवाडीतील ग्रामस्थांनी खासदार सुनील तटकरे यांना साकडे घातले त्यावेळी खासदार तटकरे यांनी इंदरदेव ग्रामस्थांना तत्काळ घरे बांधण्यासाठी तसेच रस्त्यासाठी शर्थीचे प्रयत्न करणार असल्याचे आश्वासन दिले. याबाबत शुक्रवार, १७ ऑक्टोबर रोजी सुतारवाडी येथील गिता बाग येथे बैठक घेण्यात आली.

या वेळी खासदार सुनिल तटकरे यांच्या समवेत रोहा प्रांताधिकारी ज्ञानेश्वर खुटवड, रोहा तहसीलदार डॉ. किशोर देशमुख, गटविकास अधिकारी शुभदा पाटील, वनविभाग अधिकारी जाधव त्याचबरोबर ग्रामसेवक भारती पालकर, निलेश जंगम, अनंत देशमुख, आप्पा देशमुख, धामणसई येथील युवा कार्यकर्ते अनंत कोकळे, मंगेश कोकळे ग्रामस्थ धावू कोकळे, भगवान कोकळे, ज्ञानेश्वर कोकळे, संदीप केंडे, विलास कोकळे, गणेश कोकळे, गजानन कोकळे, रोशन कोकळे, अंकुश वाघमारे आणि इंदरदेव ठाकूरवाडीतील ग्रामस्थ किसन वाघ, किसन शिद, शांताराम शिद नरेश शिद, भगवान शिद, यशवंत शिद, रमेश शिद, दत्ता शिद, गोविंद शिद, काशीबाई शिद, गुणी शिद, लता शिद, यशवंत शिद आदी उपस्थित होते.

## तटकरे महाविद्यालयातर्फे फराळ, दिवे यांचे वाटप

**माणगाव : प्रतिनिधी**

दिवाळीचा सण हा गोड व आनंदित साजरा व्हावा या हेतूने माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाचे द.ग. तटकरे महाविद्यालय माणगाव रायगड राष्ट्रीय सेवा योजना विभाग आयोजित एक हात मदतीचा आदिवासी बांधवांसाठी या उपक्रमांतर्गत फराळ व दिवे यांचे वाटप शुक्रवारी राबविण्यात आला.




या उपक्रमांतर्गत राष्ट्रीय सेवा योजना विभागांमधून फराळ, व त्यांच्या घरात रोषणाई व्हावी याकरिता दिवे हे वाटण्यात आले. राष्ट्रीय सेवा योजना विभाग हा नावीन्यपूर्ण उपक्रमांचा आयोजन हे दरवर्षी सातत्याने करत असते. या सातत्यपूर्ण कार्यक्रमांचे नियोजन राजीव साबळे साहेब - अध्यक्ष माणगाव शिक्षण प्रसारक मंडळ यांच्या मार्गदर्शनाखाली होत असते.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.बी.एम खामकर यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या कार्यक्रमाधिकारी प्रा. नेहा तुराई, व स्वप्निल सकपाळ, यांनी आदिवासी बांधवांना फराळ व दिवे वाटले.

## मुरूडमध्ये शिवसेनेचा मनोमिलन संवाद मेळावा

**मुरुड : प्रतिनिधी**

बारशिव येथे शिवसेना मुरुड ग्रामीण व शहरी भागातील कार्यकर्त्यांचा मनोमिलन संवाद मेळावा झाला. या वेळी आमदार दळवी मार्गदर्शन केले.



या वेळी व्यासपीठावर रोहा तालुका अध्यक्ष मनोज कुमार शिंदे, अलिबाग मुरुड विधासभा संपर्क प्रमुख संजीवनी नाईक,जिल्हा संघटिका तृप्ती पाटील,शिवसेनेचे रायगड जिल्हा उपप्रमुख भरत बेलोसे, मुरुड तालुका शिवसेना अध्यक्ष निलेश घाटवळ, मुरुड शहर अध्यक्ष संदीप पाटील, माजी नगराध्यक्ष स्नेहा पाटील, सुपारी संघाचे चेअरमन बाबा दांडेकर, मुरुड तालुका बांधकाम विभाग अध्यक्ष दिनेश मिणमीने, राजपुरी जिल्हा परिषद संपर्क प्रमुख जीविता मिणमीने, मुरुड तालुका संघटक यशवंत पाटील, सी. एम. ठाकूर, ऋषिकांत डोंगरीकर, विघ्नेश माळी आदी असंख्य मान्यवर उपस्थित होते. यावेळी सदर कार्यक्रमात काँग्रेस आय पक्षाचे ज्येष्ठ नेते अजगर दळवी यांनी आपल्या दोन ग्रामपंचायत सदस्य यांच्यासह जाहीर पक्षप्रवेश केला. त्याच प्रमाणे रोहा येथील अॅड. मयुरी मोरे यांनी सुधा शिवसेनेत जाहीर पक्ष प्रवेश केला.

राजपुरी मुस्लिम समाज, खरंबोली आदी भागातील मोठे पक्ष प्रवेश झाले. त्याच प्रमाणे विविध कार्यकर्त्यांची विविध पदावर नियुक्ती करण्यात आली.

उपजिल्हाप्रमुख युवा सेना प्रमुख दीपेश वरणकर मुरुड बांधकाम कामगार सेना अध्यक्ष दिनेश मिनमिने यांच्या नेतृत्वाखाली युवा सेना उपतालुकाप्रमुख निलेश तांबटकर युवासेना चिटणीस अविनाश शिंदे राजपुरी विभाग युवासेना अध्यक्ष अनंत पाटील निवड करण्यात आली. या कार्यक्रमासाठी मोठा जनसमुदाय उपस्थित होता.

## अर्चना पाटील यांना पुरस्कार



**धाटाव : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा परिषदेच्या वतीने आयोजित भव्य पुरस्कार समारंभात रोहा तालुक्यातील तळाघर-बोरघर ग्रामपंचायतीच्या ग्रामसेविका अर्चना पाटील यांना रायगड जिल्ह्याचा आदर्श ग्रामसेविका पुरस्कार प्रदान करण्यात आला.

हा सन्मान महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे, आमदार महेंद्र दळवी तसेच जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी मा. नेहा भोसले (आयएएस) यांच्या शुभहस्ते अलिबाग येथे देण्यात आला.

ग्रामविकास, स्वच्छता अभियान, जलसंधारण, महिला सक्षमीकरण आणि ग्रामपंचायतीतील पारदर्शक प्रशासन या क्षेत्रांतील अर्चना पाटील यांचे योगदान उल्लेखनीय ठरले आहे. त्यांच्या कष्टाळू व दूरदर्शी कार्यपद्धतीमुळे तळाघर-बोरघर ग्रामपंचायतीने अनेक विकासकामांत आदर्श घालून दिला आहे. या सन्मानाबद्दल रोहा तालुक्यासह संपूर्ण रायगड जिल्ह्यातून अर्चना पाटील यांचे मनःपूर्वक अभिनंदन होत आहे.

## खोपोलीत मोफत आरोग्य तपासणी, रक्तदान शिबिर

**खोपोली : प्रतिनिधी**



भाजपचे युवा नेते विक्रम यशवंत साबळे यांच्या वाढदिवसानिमित्त खोपोली मोफत आरोग्य तपासणी व भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

महाराजा मंगल कार्यालयात आयोजित शिबिरात खोपोली शहरातील भजनी मंडळांचा ही सन्मान करण्यात येणार आहे. हा सोहळा रविवारी १९ ऑक्टोबर रोजी सकाळी दहा ते दोन या वेळेत होणार आहे. विक्रम साबळे फाउंडेशन व खारघर येथील मेडिकल हॉस्पिटल यांच्या सौजन्याने या भव्य शिबिराचे आयोजन करण्यात आल्याचे भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ नेते यशवंत साबळे यांनी सांगितले.

या शिबिराला पक्षाचे वरिष्ठ नेते त्याप्रमाणे खोपोली शहरातील विविध सामाजिक संघटनांचे कार्यकर्ते व नागरिक सहभागी होणार असे आयोजकांकडून सांगण्यात आले आहे.

## ज्येष्ठ नागरिकांसोबत दिवाळी साजरी

**माणगाव : प्रतिनिधी**

कॉलेज ऑफ सोशल वर्क, निर्मला निकेतन (मुंबई) यांच्या फील्ड अॅक्शन प्रोजेक्ट 'प्रवास' अंतर्गत गोरेगाव पश्चिम येथील भगतसिंग नगर आणि विटभट्टी समुदायातील ज्येष्ठ नागरिकांसोबत आंतरधर्मीय दिवाळी साजरी करण्यात आली. विविध जाती, धर्म आणि पार्श्वभूमी असलेल्या सुमारे ५० ज्येष्ठ नागरिकांनी या उपक्रमात उत्साहाने सहभाग घेतला.



कार्यक्रमाचे उद्घाटन दोन्ही समुदायांतील ज्येष्ठ नागरिक, कॉलेजच्या विस्तार केंद्रातील कर्मचारी आणि विद्यार्थी समाज कार्यकर्त्यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी सामाजिक एकतेचा आणि सणाच्या सार्वत्रिकतेचा संदेश प्रभावीपणे व्यक्त झाला.

या वेळी कॉलेजच्या प्राचार्या डॉ. लिडविन डायस, विस्तार केंद्राचे संचालक क्लीटस झुझार्ट, आणि सहयोगी संचालिका मिस. निलीमा रॉड्रिग्ज प्रमुख पाहुण्यांच्या रूपाने उपस्थित होते.



रोहा : वसुबारसनिमित्ताने गोमातेचे शहरातील राम मारुती चौकात रोहेकरांनी पूजन केले. या वेळी समीर कुलकर्णी, पोलीस सुनील सकपाळ, सुरेश मेहता आदी उपस्थित होते.

## अंकुर फाऊंडेशनतर्फे दुर्गम भागात अन्नदान

**माणगाव : प्रतिनिधी**

मानवतेसाठी सर्वात मोठी सेवा म्हणजे भुकेल्या माणसाला अन्नदान होय. या भावनेतूनच लोणेरे येथील अंकुर फाउंडेशन गेली अकरा वर्षे दुर्गम भागातील गरीब आदिवासी विद्यार्थी व त्यांचे पालक यांच्यासमवेत जागतिक अन्नदान दिन साजरा करत आहे.

यावर्षी १६ ऑक्टोबर रोजी हा उपक्रम माणगाव तालुक्यातील राजिप शाळा कुम्शेत आणि शिरवली आदिवासी वाडी येथे उत्साहात संपन्न झाला. या ठिकाणी अनेक गरीब व वंचित विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. त्या लहानग्यांना आणि त्यांच्या पालकांना एकत्र येऊन प्रेम, आपुलकी व सहानुभूतीपूर्वक अन्नदान करण्यात आले. खास वैशिष्ट्य म्हणजे दरवर्षी संस्थेच्या उपस्थित सर्व सदस्य व पदाधिकारी स्वतः रुचकर जेवण बनवून या विद्यार्थ्यांना जेऊ घालतात. यावेळेस सर्व शिक्षकवृंद व ग्रामस्थ उपस्थित होते.

सामाजिक बांधिलकी जपत या अन्नदानासाठी सहकार्य करणाऱ्या दानशुरांचे आभार व्यक्त करण्यात आले. या अन्नदान दिनी आपण सर्व मिळून भूक मिटवू, माणुसकी वाढवू आणि समाजात आपलेलणाचा संदेश पोहोचवू या असा संदेश देण्यात आला.



# संस्कृतभारती

भारतीय एकात्मता हे शब्द उच्चारल्यावर आपल्या डोळ्यासमोर भारतातील नद्या, पर्वत, मंदिरे वगैरे विषयांसोबतच अजून एक महत्त्वपूर्ण गोष्ट येते, ती म्हणजे संपूर्ण भारतात विविध ग्रंथसंपदेच्या माध्यमातून गौरवपात्र ठरलेली आपली संस्कृतभाषा. सध्याच्या काळात जरी संस्कृतभाषा व्यवहारात वापरली जात नसली, तरी वेद पुराणे, रामायण, महाभारत इ. धार्मिक साहित्याची भाषा म्हणून भारतात सर्वत्र या भाषेविषयी आदर आहे. एके काळी ती बोलीभाषा म्हणून प्रचारात होती, हे शाकुन्तल, प्रतिमा आदि भासकवीची नाटके यावरून सप्रमाण सिद्ध होते. संस्कृत, संस्कार आणि संस्कृति ही त्रिसूत्री जोपर्यंत सांभाळली जात होती, तोपर्यंत भारत ज्ञान-विज्ञान-तंत्रज्ञान, सर्वच क्षेत्रात गुरुस्थानी होता. पण मध्यंतरीच्या काळात विविध परकीय आक्रमणे आणि १५० वर्ष इंग्रजांची गुलामी यामुळे संस्कृतभाषा, तिच्या माध्यमातून होणारे संस्कार आणि संस्कारांमुळे टिकलेली संस्कृती यांचा ह्रास झाला.

भारताला पुन्हा एकदा वैभवाच्या शिखरावर नेण्यासाठी केवळ भौतिकच नव्हे तर आध्यात्मिक उन्नती साधावी लागेल, आणि त्यासाठी नित्यनूतन, ज्ञानविज्ञान संस्कृतभाषा व्यवहारात आणावी लागेल, या उद्देशाने १९८१ यावर्षी हिन्दू-सेवा-प्रतिष्ठान संस्थाद्वारा एका आन्दोलनास आरंभ झाला. संस्कृत केवळ स्तोत्रमंत्रांची भाषा नसून विज्ञान-तंत्रज्ञानाची भाषाही आहे, हे समजण्यासाठी ती भाषा रोजच्या व्यवहारात बोलली गेली पाहिजे हे या आन्दोलनाचे मुख्य उदिदष्ट होते. याकरता काही समर्पित कार्यकत्यांनी संपूर्ण भारतात प्रचलित भाषांचा अभ्यास करून सर्वांना सहज समजेल व बोलता येईल असा एक संस्कृत संभाषणाचा अभ्यासक्रम तयार केला, व त्याच्या प्रसारास आरंभ केला. १९९९ मध्ये

या आंदोलनास दृढता देण्यासाठी संस्कृतभारती या संघटनेची स्थापना करण्यात आली. संस्कृतसंभाषण-माध्यमाने संस्कृतिरक्षण आणिः संभाषणापासून शास्त्रापर्यंत ही दोन मुख्य लक्ष्ये घेऊन गेली ५० वर्षे संघटनेचे कार्य अव्याहतपणे चालू आहे..

बेंगलुरु येथे मअक्षरम्फ हे संघटनेचे मुख्य कार्यालय आहे. तसेच नवी दिल्ली शहरात सध्या आन्तराष्ट्रिय केंद्राची उभारणी सुरु आहे. याखेरीज भारतातील प्रत्येक राज्यात संघटनेचे कार्य चालू आहे. संघटनेच्या वाटचालीतील काही महत्त्वाचे टप्पे- १९८४ लोकसभेत सांसदांसाठी संभाषणा शिबिर, २००० संस्कृतवर्ष १९९४- दिल्लीत एकाच वेळी १००८ शिबिरांचे आयोजन. २०१३- विश्वसम्मेलन दिल्ली येथे.

संस्कृतभारतीफ संघटना प्रामुख्याने संस्कृतसम्भाषण माध्यमाने हसत खेळत संस्कृतशिक्षण देण्याच्या उद्देशाने विविध उपक्रम चालविते. व्यातील अत्यंत मूलभूत उपक्रम म्हणजे संस्कृत संभाषणशिविर ! १० दिवस, रोज २ तास असे स्वरूप असणाऱ्या या शिबिरात विनाव्याकरण, हसत खेळत व्यावहारिक संस्कृतसंभाषण शिकविले जाते. निःशुल्क चालविल्या जाणाऱ्या या शिबिराचा आतापर्यंत काही कोटी लोकांनी लाभ घेतलेला आहे. स्वतःचे नाव, परिचय, येथून सुरवात करुन शिबिरार्थी १० दिवसांनंतर व्यवहारात उपयुक्त संस्कृतवाक्ये निश्चितपणे बोलू शकतो व भाषा शिकण्याविषयी आत्मविश्वास प्राप्त करतो, असा सर्व कार्यकर्त्यांचा अनुभव आहे. याखेरीज वय वर्ष ७ ते १२ मुलांसाठी, बालकेंद्र उपक्रम चालविला जातो. यात संस्कृत गाणी, गोष्टी, खेळ, श्लोक, सुभाषित, शिष्टाचार इ. माध्यमाने बालवयातच संस्कार केले जातात. इयत्ता ५वी ते नववीच्या विद्यार्थ्यांसाठी शाळांमधून देववाणी संस्कृत हा उपक्रम राबविला जातो. यात मुलांना चित्रपुस्तकाच्या संहाय्याने संस्कृत शिकण्यास रुचि निर्माण केली जाते. वय वर्ष १९ च्या पुढील कोणालाही घरबसल्या संस्कृत शिकण्यास पत्राचारद्वारा संस्कृत हा उपक्रम १३ भाषांतून संपूर्ण भारतात चालविला जातो. यात व महिन्यांचे अभ्यासक्रम आहेत, ज्यातून रंजक पद्धतीने संस्कृत व्याकरण, साहित्यपरिचय, व्यावहारिक संस्कृत शिकविले जाते. याशिवाय संस्कृतभाषेतूनच भगवद्गीता शिकण्यास गीताकेंद्र, संभाषण कौशल वाढविण्यास निवासी वर्ग, व्याकरणवर्ग, काव्यवर्गही घेतले जातात.

संभाषणाबरोबरच संस्कृत वाचनासाठी मसंस्कृतभारती संस्थेने सोप्या भाषेत जवळपास ३०० पेक्षा अधिक पुस्तके प्रकाशित केली आहेत, यात सरलसंभाषण, कथापुस्तके, संस्कृतगाणी, व्याकरण इ. पुस्तकांचा समावेश आहे. मसंभाषण संदेशफहे पूर्णतः संस्कृतमासिक आता भारताबरोबरच विदेशातही ग्राहकापर्यंत पोचत आहे. अशाप्रकारे शक्य त्या सर्वप्रकारे, प्रत्येकाच्या मुखात संस्कृत आणण्यासाठी संघटना निरंतर कार्य करत आहे.

आपल्या कुलाबा जिल्ह्यातही गेल्या वर्षांपासून संघटनेचे कार्य चालू आहे. दरवर्षी १० दिवसांची संभाषण शिबिरे होत असतातच, त्याशिवाय खोपोली, अलिबाग, उलवे अशा १० ठिकाणी बालकेंद्र उपक्रम चालू आहे. सामान्यतः ७ ते ८ शाळांमध्ये देववाणी केंद्र सुरु आहे. पत्राचारद्वारा संस्कृत उपक्रमाद्वारे आजपर्यंत हजारो लोकांनी संस्कृतभाषेचा अभ्यास सुरू केला आहे. महत्त्वाचे म्हणजे वरील सर्व उपक्रम निःशुल्क शिकविले जातात, केवळ पुस्तक व परीक्षा शुल्क घेतले जाते. संस्कृत भारती-कुलाबा जिल्हा - परिसरातील जवळपास २५ कार्यकर्ते, त्यातही महिला अधिक, या पवित्र कार्यात सहभागी आहेत.

संस्कृतभारतीचे हे कार्य असेच वृद्धिंगत व्हावे, जास्तीत जास्त लोकांनी या पवित्र कार्यात आपलाही सहभाग द्यावा, आणि समाज सुसंस्कृत करण्यात आपले योगदान द्यावे, हीच नम्र विनंती.

**-विक्रांत जोशी,**
(रायगड विभाग संयोजक)
संस्कृतभारती-कुलाबा, रायगड

# कै. अनंत श्रीधर ओक वनौषधी संशोधन व संवर्धन प्रतिष्ठान










कै. अनंत श्रीधर ओक वनौषधी संशोधन व संवर्धन प्रतिष्ठान ही सेवा संस्था नांगुर्ले, कर्जत येथे स्थित आहे. १९९६ साली कै. अनंत श्रीधर ओक ह्या व्यक्तीने सदर साडेसहा एकर जागा दान म्हणुन दिली, पण त्यांनी एक इच्छा बोलून दाखविली की सदर जागा मी जवळपासच्या वनवासी वाड्यावरिल तसेच गोरगरीब समाजासाठी उपयोग करीत असतो तसेच माझे काम पुढे चालावे.

कर्जतचा जवळपास ७५ टक्के भाग हा वनवासी असून शहरापासून जवळपास ३० किलोमीटर अंतरावर आहे. त्यांच्या सर्वांगिण विकासासाठी संस्था केंद्रस्थानी ठेवून नियोजन करण्यात आले. वनवासींचा विकासाचे मूळ साधन लक्षात घेता कर्जतच्या डोंगरमाथ्यावर दुर्मिळ औषधि वनस्पतींचा साठा उपलब्ध होता त्याचा अभ्यास करण्यात आला. तसेच परिसरातील वैद्यकीय सेवा ही वैदू आणि सुईणी ह्यांच्या आधारावर चालत होती. त्याचा सुद्धा अभ्यास करण्यात आला, मागोवा घेतला गेला. म्हणुनच संस्थेचे नाव वनौषधी संशोधन व संवर्धन असे ठेवण्यात आले.

सेवा संस्थेचे काम हे चार स्तरावर चालते म्हणुन त्याप्रमाणे नियोजन करण्यात आले.

१) शिक्षणः दुर्गम भागात शिक्षणाचा अभाव असल्याने गावोगावी अभ्यासिकेच्या माध्यमातून अभ्यासाला पाठबळ देण्यात आले. त्यामुळे सर्वदूर सगळीकडे शिक्षणाचा प्रसार झाला, मुले चांगली शिकून पुढे जावू शकली. आजसुद्धा कार्यकर्त्यांअभावी पाच वाड्यावर अभ्यासिका चालू आहेत.

२) आरोग्यः दुर्गम भागात वैद्यकीय सेवा पोहोचत नसल्याने आरोग्याची दुरावस्था होती, परिणामी बालकांमध्ये कुपोषण आढळून आले. पूरक पोषक आहार आणि औषधि ह्यांचा वापर करून कुपोषण १०० टक्के आटोक्यात आणण्यात यश आले.

६३ वाड्यावर आरोग्यरक्षक पेट्याच्या माध्यमातून ग्रामीण आरोग्य सांभाळू शकलो. अत्यावश्यक सेवेच्या वेळी पनवेल येथील डॉ. पटवर्धन रुग्णालय, खारघर येथील येरळा मेडिकल, परळ येथील टाटा, वाडीया, नायर ह्या दवाखान्यातून सवलतीत सेवा उपलब्ध करून देण्यात आली. येरळा मेडिकलच्या माध्यमातून चाललेली जझऊ आणि वैद्यकीय शिबिरे सहाय्यभूत ठरली.

४२ वैदूचे एकत्रीकरण करून त्यांना प्रशिक्षित करून, औषधि पुरविण्यात आली. वैदू हे आपल्या बांधवांवर मोफत इलाज करीत आहेत.

पुण्यातील एका कंपनीच्या CSRFUND माध्यमातून १३०० बालकांसाठी (२ ते ८ वयोगटातील) पौष्टिक आहार वितरण चालू आहे.

३) स्वावलंबनः परिसरात महिलांचे तसेच पुरुषांचे बचत गट स्थापन करण्यात आले आहेत. बचत गटांना प्रशिक्षण देण्यात आले. महिला पापड, लोणची, कुरडया, शेवया, मसाले इ. माल तयार करून विकू लागल्या. आपला माल पुणे, मुंबई येथील ग्राहक पेठांमध्ये घेऊन जावू लागल्या, संस्थेने पेठेत गाळे उपलब्ध करून दिले. महिला निर्भर झाल्या.

काही महिलांनी गुळवेल अर्क आणि सत्व सुद्धा तयार करण्यात यश मिळविले. महिलांना शिलाई मशिन प्रशिक्षण देण्यात आले तसेच शिलाई मशीन वितरण करण्यात आले.

जंगलातून आंबे, जांभूळ, करवंदे, मोहाचि फळे, फुले, भोकरे, रिठा विक्रीसाठी आणू लागल्या. बेडेकर लोणची ह्यांची चांगली मदत झाली, चांगला भाव मिळत असे.

महिलांना राख्या बनविण्यासाठी प्रशिक्षण देण्यात आले. दोरा, लोकर पुरविण्यात येतो, उत्तम प्रकाराच्या राख्या तयार करतात. फावल्या वेळेत राख्या बनवल्या जातात. हातांना काम मिळाले. बाजारात राखीला मोठी मागणी असते.

ह्या सगळ्यांचे प्रशिक्षण केंद्रावर दिले जाते.

सह्याद्रीच्या कडे कपारीतून मध गोळा करण्याचे काम पुरुष बचत गट करीत असतात. मध १०० टक्के विश्वासार्हता असलेला, तपासून घेतला जातो. गाळून शुद्ध करून घेतला जातो.

वनवासी हेसुद्धा शेतकरीच आहेत. भात, वरी, नाचणी, तिळ ही पिके घेतली जातात तसेच भाजीपाला लागवड केली जाते.

काही वनवासी तरुणांना आध्यात्मिक म्हणजेच नैसर्गिक शेतीचे प्रशिक्षण देण्यात आले. त्याचा अवलंब करून दर्जेदार आणि विषमुक्त धान्य आणि भाजीपाला पिकू लागला. बाजारपेठेत मालाला मागणी वाढली.

पुण्याच्या एका कंपनीने CSRFUND तून चालू वर्षी भाजीपाला बियाणे वाटप करण्यात आले.

४) सामाजिक संस्कार: महिला बचत गट आणि आरोग्य रक्षक ह्यांचे जाळे तयार झाल्यावर वाड्यांवर उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. गणपती आणि नवरात्र उत्सव साजरे होऊ लागले. संपूर्ण वाडीचा उत्सव एकत्रितपणे साजरा होवू लागला .

जेवण, भजन, कीर्तन एकत्रित होवू लागले, परिणामी आध्यात्मिक भाव वाढला, समाज सांप्रदायिक बनला. गुण्यागोविंदाने राहू लागले, व्यसनमुक्ती झाली. वागण्यात संस्कारित भाव आढळून येवू लागला.

अश्याप्रकारे ह्या सेवासंस्थेला कार्यकर्ता आणि दाता ह्यांची जोड लागली आहे.

१) आरडा मेहेर, मुंबई : वनवासी पाड्यांवर दिवाळीला आनंदाचे वातावरण निर्माण व्हावे म्हणुन उत्तम प्रतीचे फराळाचे पदार्थ बनवून घेवून तसेच शाळकरी मुलांना नवीन कपडे शिवून घेवून पाठविले जातात. हे सर्व आपुलकीने नविसरता केले जाते.

२) येरळा मेडिकल कॉलेजः OPD, वैद्यकीय शिबिरे घेणे आणि वैदूना प्रशिक्षण देणे तसेच वनवासी बांधवाना सवलतीत उपचार देणे.

नाना पालकर स्मृती समिती, परळः अत्यावश्यक वैद्यकीय सेवेत आपुलकीने सहाय्य करीत असते किंबहुना जिथे गरज असेल तिथे अर्थसहाय्यसुद्धा करीत असते.

समाजातील दानशूर व्यक्तींचा सुद्धा मोठा सहभाग असतो. अशा प्रकारे या ना त्या प्रकारे मदत करून संस्थेला उपकृत करीत असतात.

अशा प्रकारे हे दुर्गम भागातील कार्य पूर्ण करण्यासाठी सर्व स्तरातील मंडळींचा ह्या ना त्या निमित्ताने सहभाग नोंदविला जात आहे. विशेष म्हणजे ह्या वनवासी समाजाला एव्हढ्या वर्षानी का होईना पण त्याची जाण झाली आहे आणि समाज स्वतः हून पुढाकार घेताना दिसत आहे.

सेवा है यज्ञकुंड । समिधासम हम जले।।

**-श्रीनिवास काणे**

# उज्ज्वल यशासाठी कठीण परिश्रम घ्या -लोकनेते रामशेठ ठाकूर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

उज्ज्वल यशासाठी कठीण परिश्रम घ्या आणि विद्यालयाच्या उत्तुंग निकालाची परंपरा कायम राखत ध्येयनिष्ठपणे प्रगती साधून जीवनात यशस्वी व्हा, असे आवाहन रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य लोकनेते माजी खासदार रामशेठ ठाकूर यांनी विद्यार्थ्यांना केले.



रयत शिक्षण संस्थेच्या गव्हाण कोपर येथील श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ.भगत ज्युनिअर कॉलेजमध्ये विद्यार्थी, शिक्षक व पालक सहविचार सभेत बोलताना त्यांनी विद्यार्थ्यांनी जीवनात यशस्वी होण्यासाठी परिश्रमपूर्वक अभ्यास करावा, विशेषतः कठीण विषय समजून घ्यावा व अधिक अभ्यासपूर्वक यश संपादन करून विद्यालयाच्या उज्ज्वल यशाची उत्तुंग परंपरा कायम राखावी, असे आवाहन केले.

ज्युनिअर कॉलेजमध्ये विद्यार्थी सुरक्षा व भौतिक सुविधा विकसन समिती अंतर्गत इयत्ता ११ वी व १२ वीच्या विद्यार्थ्यांच्या पालकांची सहविचार सभा शुक्रवार १७ ऑक्टोबर रोजी विद्यालयाच्या स्थानिक शाळा समितीचे अध्यक्ष तथा संस्थेचे जनरल बॉडी सदस्य अरूणशेठ भगत यांचे अध्यक्षतेखाली झाली. या वेळी ज्युनिअर कॉलेजमधील कला व वाणिज्य शाखेतील विद्यार्थी प्रगतीचा आढावा घेण्यात आला. माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी सदिच्छा भेट दिली. त्यांची भेट नेहमीच चैतन्यदायी असते. विद्यालयाचे वतीने त्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले.

विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वृद्धीसाठी विद्यालय राबवित असलेल्या उपक्रमांना विद्यार्थ्यांनी सक्रीय प्रतिसाद द्यावा व पालकांनीही सहकार्य करावे असे आवाहन करतानाच आयुष्यभर सुखी समृद्ध जीवन जगायचे असेल तर ह्या महत्त्वाच्या शैक्षणिक टप्प्यावर विद्यार्थ्यांनी थोडा परिश्रमपूर्वक अभ्यास करून हमखास यश संपादन करावे, असे आवाहन त्यांनी केले.

या पालक सभेसाठी संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य लोकनेते रामशेठ ठाकूर यांची विशेष उपस्थिती लाभली तसेच अध्यक्ष अरूणशेठ भगत यांचेसह स्थानिक शाळा समितीचे ज्येष्ठ सदस्य अनंताशेठ ठाकूर व विश्वनाथ कोळी, गव्हाण ग्रामपंचायतचे माजी उपसरपंच विजय घरत, ॲड.राहुल घरत, ज्येष्ठ नेते जयवंत देशमुख, विद्यालयाच्या प्राचार्य जोत्स्ना ठाकूर, उपमुख्याध्यापक विलासराव लेंभे, पर्यवेक्षिका शशिकला पाटील, संस्थेचे लाईफ मेंबर रवींद्र भोईर, वर्कर देवेंद्र म्हात्रे, विभाग प्रमुख संजय उगले, ज्येष्ठ शिक्षक सागर रंधवे, ज्युनिअर कॉलेजचे सर्व शिक्षक, विद्यार्थी व पालक उपस्थित होते. विश्वनाथ कोळी यांचेही मार्गदर्शन लाभले.

विद्यालयातील 'पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर करिअर गाईडन्स क्लबच्या 'नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचे मान्यवरांचे शुभहस्ते पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन करण्यात आले.



## विद्यार्थ्यांना वाहतूक नियम प्रबोधनासह हेल्मेटचे वाटप

**उरण : प्रतिनिधी, बातमीदार**

आयसीआयसी आय लोंबर्ड इन्शुरन्स व सहयोग फाउंडेशन यांचे माध्यमातून उरण तालुक्यातील वीर वाजेकर विद्यालय, फुंडे येथे वाहतूक नियमांचे प्रबोधन व हेल्मेट वाटपाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

कार्यक्रमात उपस्थितांना रस्त्यावर वाहनांचे अपघात होऊ नयेत यासाठी हेल्मेट परिधान करणे, वाहन चालवतांना मोबाईलवर बोलू नये, सिग्नल जंप करू नये तसेच रस्ता सुरक्षा, वाहतुकीचे नियम याबाबत न्हावाशेवा वाहतूक नियंत्रण शाखेचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक जी.एम.मुजावर यांनी अतिशय मौलाचे प्रबोधनपर मार्गदर्शन केले.

या वेळी लोंबर्ड इन्शुरन्स कंपनीचे विनय बर्वे, फुंडे विद्यालयाचे प्राध्यापक साळुंखे, पोलीस हवालदार किरण म्हात्रे आदी उपस्थित होते.

# नानिवली येथे गोवत्स द्वादशी उत्सव आणि गोपाळकृष्ण मंदिर जीर्णोद्धार





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

खालापूर तालुक्यातील नानिवली येथे भक्ती वेदांत गोआश्रम चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने शुक्रवारी (दि. १७) गोवत्स द्वादशी उत्सव आणि गोपाळकृष्ण मंदिर जीर्णोद्धार सोहळा आयोजित करण्यात आला होता. माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत हा सोहळा झाला आणि त्यांच्या हस्ते मंदिराचे जीर्णोद्धार करण्यात आले.

या सोहळ्याला उरण मतदारसंघाचे आमदार महेश बालदी, ज्येष्ठ नेते जे.एम. म्हात्रे, तानाजी खंडागळे, प्रवीण ठाकूर, रवींद्र गायकवाड, संतोष पाटील, सुभाष कडव, हेमंत दळवी, गजानन लोगडे, अजय सूर्यवंशी, लबडे महाराज, गोशाळेचे संस्थापक दिनेशमहाराज मते, गोशाळेचे अध्यक्ष अनंतमहाराज पाटील यांच्यासह अनेक गोसेवक आणि भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या वेळी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी भक्ती वेदांत गोआश्रमाच्या कार्याचे कौतुक केले. गोआश्रमच्या माध्यमातून गोमातेची निस्वार्थपणे सेवा केली जात असल्याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले तसेच आश्रमाच्या कार्याला पाठबळ देण्यासाठी १० लाख रुपयांची देणगी जाहीर केली.

# मुंबई-पुणे एक्सप्रेस वेवर वाहतूक कोंडी

## दिवाळीच्या सुट्ट्यांमुळे सात ते आठ किमीपर्यंत वाहनांच्या रांगा

**खालापूर, खोपोली : प्रतिनिधी**

दिवाळीच्या मुहूर्तावर जर तुम्ही पुण्याकडे जायचा विचार करत असाल तर जरा थांबा! कारण शनिवार (दि. १८) सकाळपासून मुंबई-पुणे एक्सप्रेस वेवरील पुणे लेनवर प्रचंड वाहतूक कोंडी झाली.

अमृतांजन ब्रिजपासून ते खोपोली एक्सिटपर्यंत अशा एकूण सात ते आठ किमीपर्यंत वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या. एक्सप्रेस वेवर मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी झाल्याने काही वाहने खोपोलीतून



मुंबई-पुणे जुन्या महामार्गाने बोरघाटातून लोणावळाकडे जाते असल्याने दस्तुरी आणि अंडा पॉईंडजवळही प्रचंड वाहतूक कोंडी झाल्याचे दिसून आले. दीपावलीच्या मुहूर्तावर सरकारी सुट्या आणि शनिवार, रविवारी स्थानिक सुट्या आल्याने मुंबई, ठाणेकर गावाला जात आहेत काही पश्चिम महाराष्ट्रात देवदर्शनासाठी, तर काही हौसी पर्यंटक हे लोणावळा, खंडाळा येथे पिकनिकसाठी आल्याने प्रचंड वाहतूक कोंडी झाली. मुंबई-पुणे एक्सप्रेस वेवरील अमृतांजन ब्रिजपासून खोपोली एक्सिटपर्यंत शनिवारी सकाळी ६ वाजल्यापासून मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी झाली होती. ही वाहतूक कोंडी फोडण्यात बोरघाट महामार्ग पोलीस शर्थीने प्रयत्न करीत होते. या वाहतूक कोंडीचा नाहक त्रास वाहनचालक पर्यटक आणि स्थानिकांना सहन करावा लागला.

जोपर्यंत एक्सप्रेस वेवरील मिसिंग लिंक पूर्ण होत नाही तोपर्यंत अशाच वाहतूक कोंडीचा त्रास सहन करावा लागणार नाही. वाहनांच्या कर्णकर्कश आवाजाने प्रवाशांना चकटफू फटाक्यांच्या आवाजाने कानठळ्या बसल्या आहेत.

# तरुणींनी स्वतःच्या पायावर उभे राहावे

## पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांचा मौलिक सल्ला

**चौक : प्रतिनिधी**

आजकालच्या काळात जगताना सर्व मुली, स्त्रिया यांनी स्वावलंबी असावे, स्वतःच्या पार्यावर उभे राहावे, असा सल्ला रायगड जिल्हा पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांनी दिला आहे.

स्वदेस ज्ञान मित्र आयोजित गुन्हेगारी मुक्त गाव कसे ठेवता येईल या विषयावर रायगड जिल्हा पोलीस अधीक्षक आंचल दलाल या प्रमुख मार्गदर्शक म्हणून झूम मीटिंगद्वारे संदेश देत होत्या. स्वदेस ज्ञान मित्र, शासन मित्र, स्वदेस मित्र तसेच पोलीस, ग्रामपंचायत सदस्य, पोलीस पाटील, ग्रामस्थ, हे लिंकवर जॉईन होते.



गुन्हेगारीवर नियंत्रण ठेवण्यासाठी गावाने एकोप्याने राहणे महत्त्वाचे आहे. यासाठी गावोगावी निर्णय झाल्यास गुन्हेगारी मुक्त होण्यास सुरुवात होईल. काही लोक जन्मताच विकृत असल्याने शून्य गुन्हेगारी होणे कठीण आहे, पण दामिनी पथक, निर्भया पथक यांना सहकार्य करावे व त्यांचा सल्ला घेतल्यास गुन्हेगारीला आळा बसेल, असे पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांनी सांगितले.

अवैद्य धंदे, दारूबंदी, जुगार, मटकामुक्ती करण्यासाठी महिलांनी पुढे येणे गरजेचे आहे, कारण यात महिलांना जास्त त्रास होतो. संसाराची घडी बसविण्याचे काम महिला करतात. त्यामुळे महिला यांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहन करून आंचल दलाल यांनी गुन्हेगारी निराकरण, दारूमुक्ती, महिला सक्षमीकरण यावर भर दिला.

स्थानिक भूमिपुत्रांना नोकरी, व्यवसायात प्राधान्यक्रमाने संधी मिळाली पाहिजे. त्यांनीही वेगवेगळ्या क्षेत्रात कौशल्य प्राप्त केले पाहिजे, असे मतही त्यांनी व्यक्त केले. या झूम मीटिंगसाठी जवळपास चारशे लोकांनी चर्चेत सहभाग घेतला.

# टेम्पोचालकाच्या प्रसंगावधानाने एसटी बसमधील प्रवाशांचे वाचले प्राण

**खालापूर : प्रतिनिधी**

बोरघाटात खोपोली बायपास मार्गावरून खोपोलीत उतरत असताना मिळठाकूर येथे बीड येथून रोहा येथे जाणाऱ्या महामंडळाच्या एसटी बसचा टायर पंक्चर झाला असता बस मार्गाच्या बाजूला उभी करुन पंक्चर काढण्याचे काम सुरू होते. बसमधील सर्व पॅसेंजर खाली उतरून रस्त्याच्या कडेला उभे होते. त्याचवेळी मागून खोपोलीकडे येणाऱ्या टेम्पोचा ब्रेक फेल झाला. टेम्पोचालकाने प्रसंगावधान राखून स्वतःचा जीव धोक्यात घालत रस्त्याच्या कडेला टेम्पो उतरवल्याने टेम्पो खड्ड्यात पलटी झाला. सुदैवाने या



घटनेने बस प्रवाशांचे प्राण बालंबाल वाचले.

अपघात भयंकर होता. तरीदेखील कोणत्याच स्वरूपाची जीवित हानी झाली नाही. टेम्पोचालकाच्या धैर्याला सर्वच प्रवाश्यांनी सलाम करीत जीव वाचल्याने देवाचे व टेम्पो चालकाचे आभार मानले. या अपघातात टेम्पोचे मोठे नुकसान झाले. दीपावलीच्या पूर्वसंध्येला सर्वांचे दैव बलवत्तर होते म्हणून कोणताही विपरीत प्रकार घडला नाही. हेल्प फौंडेशनची टीम मदतकार्य करण्यासाठी संपूर्ण तयारीनिशी त्या ठिकाणी पोहचली होती.

## राष्ट्रीय पोषण माह साजरा

**माणगाव : प्रतिनिधी**

एकात्मिक बाल विकास सेवा योजना प्रकल्प माणगाव शिरवली बिट १चा आठवा राष्ट्रीय पोषण माह नुकताच साजरा करण्यात आला. यामध्ये लोककला, पथनाट्य, पोषण आहार प्रात्यक्षिक, मुलांची गाणी, गोष्टी, पालेभाज्यांची पोषण परी तयार करून पोषणाचे महत्त्व सांगण्यात आले. कार्यक्रमास विस्तार अधिकारी मधुकर फड, बीट पर्यवेक्षिका सीमा ठाकरे, म्हात्रे, मदगे, रब्बेवार, शिगवण, मोरे यांच्यासह प्राथमिक आरोग्य केंद्रातील डॉक्टर, विस्तार अधिकारी, आरोग्य पर्यवेक्षक, आरोग्य सेविका, आशा, सीआरपी, बचत गटातील महिला, ग्रामस्थ उपस्थित होते.

# मुरूड नवाबांच्या नावावरील जमीन शासनजमा करण्याची मागणी

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील मुरूडच्या माजी नवाबाच्या जमिनींची विक्री तत्काळ थांबवावी तसेच या जमिनी शासनाकडे जमा कराव्यात व त्यातील अतिरिक्त शेत जमिनी गरजूंना वाटून द्याव्यात, अशी मागणी सर्वोच्च न्यायालयाच्या वकिल सोनिया राज सूद यांनी गुरुवारी (दि. १६) अलिबाग येथे पत्रकार परिषद केली. न्याय सबका अधिकार या सामाजिक संस्थेचे प्रमुख ॲड. मंगेश गजानन घोणे त्यांच्या समवेत उपस्थित होते.

मुरूडच्या माजी नवाबाचे १ एप्रिल १९७२ निधन झाले. नवाबांच्या नोंदीवर अनिवार्य मृत्युपत्र नसतानाही मुरूड तहसीलदार कार्यालयाने त्यांच्या पाच मुलांच्या नावे



हजारो एकर जमिनीची नोंद बेकायदेशीरपणे केली. कायद्याने कृषी जमीन धारण करण्याची कमाल मर्यादा केवळ ५४ एकर इतकी आहे. मुरूड जंजिऱ्याचे दिवंगत नवाब सिदी मोहम्मद खान यांच्या वारसांना जिल्हाधिकाऱ्यांनी सुमारे चार हजार ५०० एकर जमीन धारण करण्याची परवानगी दिली आहे, जी बहुतांशी शेतजमीन आहे. या जमिनी विकल्या जात आहेत. १९९३ ते १९९९ या कालावधीत दहशतवादी इक्बाल मिर्चीची पत्नी हजरा इक्बाल मेमन यांना काशिद बीचवरील १०० एकर जमिनीची विक्री झाली. २०१८मध्ये पॅलेसजवळील शेतजमीन आणखी एका शस्त्र तस्कर व इक्बाल मिर्चीच्या जवळच्या नातेवाईकाला विकण्यात आली, असा गंभीर आरोप ॲड. सोनिया सूद यांनी पत्रकार परिषदेत केला.

# वस्तीशाळा शिक्षकांची पूर्वीची नियुक्ती सेवाकाळासाठी ग्राह्य धरावी

### शिक्षक परिषदेच्या मागणीला मिळाला सकारात्मक प्रतिसाद

**अलिबाग : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद प्राथमिक विभागाचे संस्थापक आमदार संजय केळकर यांच्या मार्गदर्शनात मंत्रालयात शिक्षण राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर यांची परिषदेचे राज्याध्यक्ष राजेश सुर्वे यांच्या शिष्टमंडळाने भेट घेतली. वस्ती शाळा शिक्षकांच्या मुळ नियुक्तीसंदर्भात भेट घेऊन चर्चा केली व निवेदन सादर केले. या मागणीला मंत्री भोयर यांनी सकारात्मक प्रतिसाद दिल्याचे राजेश सुर्वे यांनी सांगितले.



महाराष्ट्र शासनाने वाडीवस्ती तिथे शाळा या धोरणानुसार सन २००१मध्ये वस्तीशाळा सुरू केल्या आहेत. अनेक गावातील तरुणांनी अवघ्या एक हजार रुपये मानधनावर सन २०१४पर्यंत पूर्णवेळ वस्तीशाळेवर स्वयंसेवक म्हणून काम केलेले आहे. शासनाने वस्तीशाळेवरील अप्रशिक्षित शिक्षकांना सन २०१२ ते २०१४ या कालावधीत पत्राद्वारे डीएड अभ्यासक्रम पूर्ण करून त्यांना प्राथमिक शिक्षक म्हणून नियमित सेवेत घेतलेले आहे.

यापैकी आज अनेक वस्तीशाळा शिक्षक सेवानिवृत्त होत आहेत, परंतु त्यांनी सन २००१पासून केलेल्या पूर्णवेळ सेवेचा लाभ मिळत नाही. त्यांची मूळसेवा ग्राहय धरण्याची आग्रही मागणी या वेळी करण्यात आली. याबाबत त्यांनी सकारात्मक प्रतिसाद देऊन लवकरच याबाबत विभागाकडून आढावा घेऊन उचित निर्णय घेतला जाईल, असे आश्वासन दिले.

या वेळी महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेचे राज्य कार्याध्यक्ष भरत मडके, शिक्षक भारतीचे जिल्हाध्यक्ष दीपक पाटील, राजू नाईक, रूपेश पार्टे, राजू पार्टे , निलेश तुरे, विठोबा रेणोसे, पानावकर, नगरकर आदी पदाधिकारी उपस्थित होते. शिक्षक परिषदेच्या शिष्टमंडळाने आमदार प्रवीण दरेकर यांचीही भेट घेतली.

# राष्ट्रवादीचे माथेरान शहराध्यक्ष राजेश दळवी शिवसेनेत

**माथेरान : प्रतिनिधी**

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका जवळ येत असून माथेरान शहरात राजकीय उलथापालथ सुरू झाली आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे माथेरान शहराध्यक्ष राजेश दळवी यांनी स्थानिक आमदार महेंद्र थोरवे यांच्या उपस्थितीत शिवसेनेत प्रवेश केला.

माथेरानमधील हॉटेल लक्ष्मी येथे नुकतेच शिवसेनेच्या आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी राष्ट्रवादीचे शहर अध्यक्ष राजेश दळवी यांनी आमदार महेंद्र थोरवे यांच्या कार्यप्रणालीवर आणि शहरप्रमुख चंद्रकांत चौधरी यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून शिवसेनेत प्रवेश केला आहे.

दळवी यांच्यासोबत माजी नगरसेविका विनिता गुप्ता, शाकिर मुजावर, अनिल कुंभार, राकेश पार्टे अशा अनेक कार्यकर्त्यांनीदेखील या वेळी पक्षप्रवेश केला.

व्यासपीठावर आमदार थोरवेंसह शिवसेनेचे रायगड जिल्हा युवा अध्यक्ष प्रसाद थोरवे, अंकुश दाभणे, अंकुश शेळके, संघटक मनोज खेडकर, संपर्क प्रमुख निखिल शिंदे, उपशहरप्रमुख प्रमोद नायक, ज्येष्ठ शिवसैनिक ज्ञानेश्वर बागडे, महिला अध्यक्ष संगीता जांभळे, युवासेना अध्यक्ष गौरांग वाघेला, युवती सेना अध्यक्ष अंकिता तोरणे आदी उपस्थित होते.



# गोरेगावच्या बुद्धविहारात विविध कार्यक्रम

**माणगाव : बातमीदार**

महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी १४ ऑक्टोबर १९५६ रोजी बौध्दधम्माची दीक्षा देऊन धम्मचक्र प्रवर्तन केले. या ऐतिहासिक दिनाचे औचित्य साधून पंचशील बौद्धजन सेवा संघ ३२ गाव, गोरेगाव विभाग स्थानिक, मुंबई प्रदेश, बौद्धजन पंचायत समिती शाखा क्रमांक ८४१ व पंचशील महिला मंडळ गोरेगाव विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने संबोधी बुद्ध विहार गोरेगाव येथे ६९वा धम्मचक्र प्रवर्तन दिन, वर्षावास धम्म प्रवचन मालिकेचा समारोप, डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक वर्धापन दिन आणि विद्यार्थी गुणगौरव सोहळा उत्साहात झाला.

कार्यक्रमास पंचशील बौद्धजन सेवा संघ गोरेगावचे विश्वस्त अध्यक्ष विकास गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली भदन्त शांतीबोधी, भदन्त डॉ. मैत्रियघोष आयुपाल महाथेरो, बौद्धजन पंचायत समिती उपसभापती विनोद मोरे, कार्याध्यक्ष लक्ष्मण भगत आणि अन्य मान्यवर उपस्थित होते.

वर्षावासाचा प्रारंभ भदंत शांतीबोधी यांच्या धम्म संस्कार वाणीतून तद्नंतर भदंत डॉ. मैत्रियघोष आयुपाल महाथेरो यांच्या मंगल वाणीतून होऊन उपस्थितांनी धम्म देसना ग्रहण केली. सत्कारमूर्ती डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ लोणेरेचे डॉ. चंद्रकुमार बडोले, डॉ. महेंद्र शिर्के, वक्ते तेजस आढाव, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते सदानंद येलवे, सूर्यकांत कासे, पत्रकार गौतम जाधव, विश्वास गायकवाड, शिक्षक राजू मोरे, विद्यार्थी रीना रवींद्र लोखंडे, श्रामणेर रूपेश गमरे, तनिष्क संतोष हाटे आदींचा उपरोक्त संघाच्या वतीने यथोचित सत्कार करण्यात आला.

अध्यक्षीय मनोगत विकास गायकवाड यांनी केले. कार्याध्यक्ष लक्ष्मण भगत आणि उपसभापती विनोद मोरे आदींनीही विचार मांडले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संदीप साळवी यांनी केले.



# खांबेरे येथे शेतकरी महिलांसाठी मार्गदर्शन शिबिर

**रोहा : प्रतिनिधी**

रोहा तालुक्यातील किल्ला कृषी विज्ञान केंद्रामार्फत खांबेरे ग्रुप ग्रामपंचायतीच्या सहकार्याने राष्ट्रीय महिला किसान दिवसानिमित्ताने शेतकरी महिलांकरिता शेतीपूरक प्रक्रिया उद्योगाविषयी मार्गदर्शन शिबिराचे आयोजन खांबेरे येथील एकविरा मंदिर सभागृहात करण्यात आले होते. या शिबिरास प्रतिसाद लाभला.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कृषी विज्ञान केंद्राचे प्रमुख डॉ. मनोज तलाठी, प्रमुख अतिथी म्हणून खांबेरे ग्रामपंचायतीचे सरपंच अतिश मोरे, महिला प्रतिनिधी गोरीवले आदी उपस्थित होते तसेच मार्गदर्शक म्हणून कृषी विज्ञान केंद्राचे शास्त्रज्ञ डॉ. राजेश मांजरेकर व कॅनरा बँकेच्या व्यवस्थापिका कीर्ती पाटील उपस्थित होत्या.



कार्यक्रमाच्या सुरुवातीला प्रगतशील शेतकरी व कृषी विज्ञान केंद्राच्या शास्त्रीय सल्लागार समितीचे नवनिर्वाचित सदस्य गणेश भगत यांनी मान्यवरांचे व तज्ज्ञ मार्गदर्शक आणि उपस्थित शेतकरी महिलांचे स्वागत केले. यानंतर कृषी विस्तार तज्ज्ञ डॉ. प्रमोद मांडवकर यांनी राष्ट्रीय महिला किसान दिवस साजरा करण्यामागचा उद्देश नमूद करून शेती क्षेत्रामध्ये महिलांचा असलेला सहभाग व शेतीपूरक व्यवसायांबरोबरच प्रक्रिया उद्योगांमध्ये महिला शेतकऱ्यांना असलेल्या संधी याविषयी प्रास्ताविक केले.

कृषी विज्ञान केंद्राचे तज्ज्ञ मार्गदर्शक डॉ. राजेश मांजरेकर यांनी फळ व भाजीपाला प्रक्रिया उद्योग तसेच बचत गटांच्या माध्यमातून आर्थिक सक्षमीकरण व उत्पादित मालाचे मूल्यवर्धन करून विक्री व्यवस्था करणे याविषयी सखोल मार्गदर्शन केले. मत्स्य शास्त्रज्ञ प्राध्यापक माधव गीते यांनी मत्स्य प्रक्रिया उद्योग याविषयी झालेले संशोधन व या व्यवसायामध्ये असलेल्या संधी त्याचप्रमाणे महिलांचा सहभाग याविषयी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

कॅनरा बँकेच्या व्यवस्थापिका कीर्ती पाटील यांनी बचत गटांचे सक्षमीकरण तसेच सामूहिक व्यवसाय यांना लागणारे आर्थिक पाठबळ त्याचप्रमाणे बँकेच्या असलेल्या विविध योजना याविषयी माहिती दिली व यामध्ये गावातील शेतकऱ्यांनी तसेच शेतकरी महिलांनी सहभाग घ्यावा, असे आवाहन केले. डॉ. मनोज तलाठी यांनी कृषी विज्ञान केंद्राचे विविध उपक्रम व शेतकऱ्यांसाठी असलेल्या प्रशिक्षणाच्या सुविधांचा लाभ सर्व शेतकरी महिलांनी घ्यावा असे आवाहन करतानाच महिला शेतकरी सर्वार्थाने शेतीमध्ये देत असलेले योगदान महत्त्वपूर्ण असल्याचे नमूद केले.

सरपंच अतिश मोरे यांनी राष्ट्रीय महिला किसान दिवस कार्यक्रम ग्रामपंचायत हद्दीत आयोजित केल्याबद्दल कृषी विज्ञान केंद्राचे आभार व्यक्त करतानाच ग्रामपंचायतीने गावातील शेतकऱ्यांसाठी, शेतकरी महिलांसाठी योजलेले उपक्रम याची माहिती दिली व भविष्यातील उपक्रमामध्ये शेतकऱ्यांनी सहभाग वाढवावा, असे आवाहन केले.

# तिरंदाज ज्योती वेन्नमने रचला इतिहास!

## विश्वचषक फायनलमध्ये उमटवली पदकावर मोहोर

**नानजिंग : वृत्तसंस्था**

भारतीय महिला तिरंदाज ज्योती सुरेखा वेन्नम हिने इतिहास रचला आहे. ती विश्वचषक फायनलमध्ये पदक जिंकणारी पहिली भारतीय महिला कंपाऊंड तिरंदाज ठरली. चीनमधील नानजिंग येथे शनिवारी (दि. १८) झालेल्या स्पर्धेत ज्योतीने जागतिक क्रमवारीत दुसऱ्या स्थानी असलेल्या ब्रिटनच्या एला गिब्सनविरुद्ध उत्कृष्ट कामगिरी करत कांस्यपदक पटकावले.

२९ वर्षीय आशियाई क्रीडा स्पर्धेतील विजेत्या ज्योतीने कांस्यपदकाच्या लढतीत गिब्सनचा १५०-१४५ अशा फरकाने पराभव केला. या विजयासाठी तिने सलग १५ अचूक बाण मारले. विश्वचषक फायनलमधील तिचे हे पहिलेच पदक आहे. आठ तिरंदाजांच्या या अंतिम टप्प्यात ज्योतीने अमेरिकेच्या अलेक्सिस रुईजचा उपांत्यपूर्व




फेरीत १४३-१४० असा पराभव करत दमदार सुरुवात केली होती.

उपांत्य फेरीत ज्योतीला जागतिक क्रमवारीत पहिल्या स्थानी असलेल्या मेक्सिकोच्या अँड्रिया बेसेराविरुद्ध निसटता १४३-१४५ असा पराभव पत्करावा लागला. तिसऱ्या 'एंड'नंतर ज्योती ८७-८६ अशा किरकोळ आघाडीवर होती, मात्र बेसेराने चौथ्या 'एंड'मध्ये तीन '१०' गुण मिळवून ११६-११५ अशी आघाडी घेतली आणि पाचवा 'एंड' २९-२८ने जिंकत अंतिम फेरीत प्रवेश केला. या पराभवानंतरही ज्योतीने कांस्यपदकाच्या लढतीत शानदार पुनरागमन केले. तिने सलग पाच 'एंड'मध्ये १५ अचूक '१०' गुण मिळवत गिब्सनला सहज पराभूत केले.

दरम्यान, महिलांच्या कंपाऊंड विभागात भारताची दुसरी पात्र तिरंदाज मधुरा धामणगावकर हिला पहिल्याच फेरीत मेक्सिकोच्या मारियाना बर्नालकडून १४२-१४५ अशा फरकाने पराभव पत्करावा लागला. या स्पर्धेच्या रिकर्व्ह विभागात कोणत्याही भारतीय तिरंदाजाने पात्रता मिळवली नव्हती.

# भारत-ऑस्ट्रेलिया पहिली वनडे आज

**पर्थ : वृत्तसंस्था**

भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यात रविवार (दि. १९)पासून पर्थमधील ऑप्टस स्टेडियमवरील लढतीने तीन एकदिवसीय सामन्यांच्या मालिकेला सुरुवात होणार आहे. ही मालिका भारताच्या २०२७ विश्वचषक तयारीसाठी महत्त्वाची आहे.



शुबमन गिल भारतीय वनडे संघाचा कर्णधार म्हणून पदार्पण करणार आहे. या मालिकेत रोहित शर्मा आणि विराट कोहली यांच्या कामगिरीकडे सर्वांचे लक्ष असेल. हे दोघे याआधी चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५मध्ये खेळले होते.

दुसरीकडे नियमित कर्णधार पॅट कमिन्स खेळणार नसल्याने त्याच्या अनुपस्थितीत ऑस्ट्रेलियन संघाचे नेतृत्व मिचेल मार्श करणार आहे. ऑस्ट्रेलियाचे अनेक खेळाडू संघाबाहेर आहेत.



# नवी मुंबईत घुमला कबड्डीचा दम!

## जिल्हास्तरीय शालेय स्पर्धेत दमदार खेळाचे प्रदर्शन

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महापालिका जिल्हास्तरीय शालेय कबड्डी स्पर्धेचे आयोजन डॉ. सी.व्ही. सामंत महाविद्यालय, तुर्भे येथील शाळेच्या मैदानावर तीन दिवस करण्यात आले होते. स्पर्धेत १४, १७ व १९ वर्षाआतील मुले व मुलींच्या गटात एकूण २२४ संघांनी सहभाग घेतला.

या स्पर्धेतील १४ वर्षाआतील मुलांच्या गटात अंतिम सामना नवी मुंबई महापालिका शाळा क्र. १८, सानपाडा आणि रा.फ. नाईक महाविद्यालय, बोनकोडे कोपरखैरणे यांच्यात झाला. यात सानपाडा शाळेच्या संघाने २८-२५ अशा तीन गुणांच्या फरकाने जिंकत अजिंक्यपद पटकाविले. हा संघ मुंबई विभागस्तर स्पर्धेसाठी पात्र ठरला आहे.

मुलींच्या गटात अंतिम सामना रा.फ.नाईक महाविद्यालय, बोनकोडे कोपरखैरणे आणि डी.आर. पाटील विद्यालय, तुर्भे यांच्यात रंगला. यामध्ये बोनकोडे कोपरखैरणे शाळेच्या संघाने अत्यंत चुरशीच्या लढतीत १९-१८ अशा अवघ्या एका गुणाने सामना जिंकत अजिंक्यपदाला गवसणी घातली आणि मुंबई विभागस्तर स्पर्धेसाठी पात्रताही मिळवली.

१७ वर्षाआतील मुलांच्या वयोगटातील अंतिम सामना रा.फ. नाईक महाविद्यालय, कोपरखैरणे आणि डॉ.सी.व्ही. सामंत महाविद्यालय, तुर्भे यांच्यात झाला. यात कोपरखैरणे शाळेच्या संघाने २६-२२ अशा चार गुणांनी सामना जिंकत अजिंक्यपद पटकावून मुंबई विभागस्तर स्पर्धेसाठी पात्रता मिळवली. मुलींच्या गटातही याच निकालाची पुनरावृत्ती झाली. कोपरखैरणे शाळेचा संघ २४-९ अशा १५ गुणांनी अंतिम लढत जिंकून मुंबई विभागीय स्पर्धेसाठी पात्र ठरला आहे.

१९ वर्षाआतील मुलांच्या व मुलींच्याही गटात अंतिम सामना रा.फ. नाईक महाविद्यालय बोनकोडे कोपरखैरणे आणि डॉ. सी.व्ही. सामंत महाविद्यालय तुर्भे यांच्यात झाला. मुलांमध्ये कोपरखैरणे कॉलेजच्या संघाने २९-१० अशा १९ गुणांनी, तर मुलींमध्ये संघाने २५-४ अशा २१ गुणांनी बाजी मारत मुंबई विभागीय स्पर्धेसाठी पात्रता प्राप्त केली आहे.






# किशन खारकेचा 'रौप्य'वेध

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

शिवछत्रपती स्टेडियम महाळुंगे, बालेवाडी, पुणे येथे झालेल्या रायफल शूटिंग चॅम्पियनशिप स्पर्धेत किशन खारके याने रायगड जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करत ५० मिटर फ्री पिस्टल मास्टर मेनमधून रौप्यपदक जिंकले. कॉमनवेल्थ मेडलिस्ट, संघटनेच्या सेक्रेटरी शीला कानूगो व अर्जुन अवॉर्ड विजेती अंजली भागवत यांच्या हस्ते किशनला गौरवण्यात आले.




या यशाबद्दल सिद्धांत रायफल क्लब रायगडचे अध्यक्ष विजय खारकर, प्रितम पाटील, अलंकार कोळी, महेश फुलोरे, अजिंक्य चौधरी, सुनील मढवी, राजु मुंबईकर, अविनाश भगत, समाधान घोपरकर, सुरज थळे, किरण मोहिते, प्रकाश दिसले, निलेश भगत, जगदीश पाटील, शैलेश पाटील, जयदास पाटील, संतोष फडके, अर्जुन पाटील व एएससी कॉलेज बॅच १९९७ फ्रेंड्स, स्वीमिंग टायगर ग्रुप तसेच नेरे ग्रामस्थ यांनी किशनचे अभिनंदन करून पुढील राष्ट्रीय स्पर्धेकरिता शुभेच्छा दिल्या.

# रणजी ट्रॉफी स्पर्धेत सात विकेट्स घेत शमीने दाखवून दिला फिटनेस

**मुंबई : प्रतिनिधी**

फिटनेस आणि वनडे संघात स्थान देण्यावरून वेगवान गोलंदाज मोहम्मद शमी आणि निवड समिती अध्यक्ष अजित आगरकर यांच्यात शाब्दिक देवाणघेवाण झाली होती. त्यानंतर आता शमीने मैदानावर आपल्या कामगिरीचे नाणशे खणखणीत वाजवून दाखवत एक प्रकारे त्याच्या फिटनेसवर शंका घेणाऱ्या आगरकर यांना आरसाच दाखवला आहे.

रणजी ट्रॉफी २०२५-२६च्या हंगामात बंगालकडून पहिल्याच सामन्यात खेळणारा वेगवान गोलंदाज मोहम्मद शमीने धमाका केला आहे. त्याने पहिल्या डावात ३७ धावा देत तीन विकेट्स घेतल्या, तर दुसऱ्या डावात ३८ धावांत चार विकेट्स घेतल्या. संपूर्ण सामन्यात शमीने सात विकेट्स घेत चांगली कामगिरी केली.

काही दिवसांपूर्वी एका मुलाखतीत अजित आगरकर यांनी मोहम्मद शमीच्या फिटनेसबाबत वक्तव्य केले होते. ऑस्ट्रेलिया दौऱ्यावरील वनडे संघाची निवड करताना शमी फिट नव्हता असे त्यांनी म्हटले होते.






दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मताले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com